मुंबई, रायगड, पुणे, संभाजी नगर, जालना, नांदेड, अमरावती, नागपूर, यवतमाळ, बीड, लातूर,नाशिक, जळगाव,चंद्रपूर, येथून एकाच वेळी प्रसिद्ध होणारे एकमेव दैनिक

www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

दैनिक **युवक आधार** मराठी

तरुणांचा बुलंद आवाज

■ मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले ■ संपादक - संतोष शिवदास आमले




● उपसंपादक - श्री विलास गायकवाड ● कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे ● निवासी संपादक - श्री राकेश पाटील ● सह संपादक - श्री मुकुंद कांबळे ● महाराष्ट्र संपादक - श्री अजय कापरे ● कायदेशीर सल्लागार - ॲड. सौ प्रियंका विजय मुंढे

■ वर्ष : ३ ■ अंक : २१९ ■ सोमवार, २० एप्रिल २०२६ ■ किंमत : ४ रु ■ पृष्ठ : ८ RNI MAHMAR/2023/89514



मानवता फाउंडेशन कडून "अन्नदानम " प्रोजेक्ट मार्फत खारघर आदिवासी पाड्यावर आदिवासी बांधवाना अन्नदान करण्यात आले त्या वेळी मानवता फाउंडेशन चे अध्यक्ष संजय पवार , उपाध्यक्ष विनोद नायर , विकी मेगणी टिपू पटवेगर , चेतन कदम , नंदनी सिंग , तुषार डीकुळे , आफताब आलम , विघ्नेश नारायांकर , सुरजादुबे , रोहन परदेशी , इत्यादी पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते

( दैनिक युवक आधार )

# वेदांमध्ये समृद्ध जीवनपद्धती सांगणारे ज्ञान – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

## मुख्यमंत्र्यांच्या हस्ते 'निरंजनभाई जयदेवशंकर ठाकर वेद पाठशाळे'चे उद्घाटन

**नागपूर :** जगातील सर्व संस्कृती जास्तीत जास्त ४ हजार वर्षे जुन्या आहेत, मात्र आधुनिक पद्धतीने काढलेले वेदांचे वय हे १२ हजार वर्षाहून अधिक आहे. जगातील सर्वात प्राचीन साहित्य असलेले वेद समृद्ध जीवन पद्धती सांगणारे असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. घोगली येथे निरंजनभाई जयदेवशंकर ठाकर (एनजेटी) वेद पाठशाळेचे उद्घाटन आज सायंकाळी मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते. व्यासपीठावर केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, गोविंद देव गिरी महाराज उपस्थित होते.आपली प्राचीन परंपरा पुढे नेण्यासाठी सुरू करण्यात आलेला वेद पाठशाळेचा उपक्रम स्तुत्य असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले.



ज्ञान विज्ञानाचा आधार वेदच आहेत. सनातन धर्म संपूर्ण मानव जातीचे कल्याण सांगतो. हिंदू जीवन ही जगातील आदर्श पद्धती असल्याचे केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यावेळी म्हणाले.वेद हेच आपले मूळ धन असल्याचे सांगून गोविंद देव गिरी महाराज म्हणाले की, भारतीय संस्कृतीचा पायाच वेद आहे. जगातील सर्व संस्कृती आणि भाषांचा जन्म वेदांनंतर झाला आहे. वेद हे केवळ हिंदूसाठी नाही तर मानव जातीच्या कल्याणासाठी असल्याचे गोविंद देव गिरी महाराज यांनी सांगितले.

प्रारंभी रोहन ठाकर यांनी प्रास्ताविक केले. आचार्य सागर शर्मा, नरेंद्र झा प्रभृती व्यासपीठावर उपस्थित होते.

# खारघर हिल महापौर मॅरेथॉन प्रोमो रनला उत्स्फूर्त प्रतिसाद

## 'फिट पनवेल, हेल्दी पनवेल'चा संदेश..सभागृह नेते प्रकाश बिनेदार

**दैनिक युवक आधार**

**पनवेल,प्रतिनिधी :** पनवेल महानगरपालिकेच्या वतीने आयोजित 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन प्रोमो रन' या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत कार्यक्रम उत्साहात पार पडला. नागरिकांमध्ये आरोग्याविषयी जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने आयोजित या उपक्रमात ५ कि.मी. व १० कि.मी. गटांमध्ये सुमारे २५०० हून अधिक धावपटूंनी सहभाग नोंदवला.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार प्रशांत ठाकूर आणि महापौर नितीन पाटील यांच्या हस्ते झाले. यावेळी उपमहापौर प्रमिला पाटील, सभागृह नेते प्रकाश बिनेदार, विरोधी पक्षनेते अरविंद म्हात्रे, अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, उपायुक्त डॉ. वैभव विधाते यांसह अनेक मान्यवर उपस्थित होते. महापालिका आयुक्त मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली या प्रोमो रनचे आयोजन करण्यात आले.





'फिट पनवेल, हेल्दी पनवेल' या संकल्पनेला बळ देण्यासाठी आणि स्वच्छ व हरित पनवेलचा संदेश देण्यासाठी हा उपक्रम राबविण्यात आला. विशेष म्हणजे, नियोजित २५०० नोंदणी केवळ दोन दिवसांत पूर्ण झाल्याने अनेक इच्छुक धावपटूंना सहभाग घेता आला नाही. मात्र, आगामी मुख्य मॅरेथॉनमध्ये सर्वांना संधी देण्याचे आश्वासन महापौरांनी दिले.

ऑगस्ट २०२६ मध्ये होणाऱ्या 'खारघर हिल महापौर मॅरेथॉन'साठी हा प्रोमो रन भक्कम पायाभरणी ठरला आहे. आगामी स्पर्धेत ५, १०, २१ (हाफ) आणि ४२ कि.मी. (फुल) मॅरेथॉनचा समावेश असणार आहे. या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी लेट सेलिब्रिटी फिटनेस क्लब व नवी मुंबई रनर्स असोसिएशन यांनी विशेष सहकार्य केले.

# अनाथ मुलींच्या विवाहासाठी ५ लाखांच्या निधीची तरतूद करा

## डॉ. विष्णू उकंडे यांचे मुख्यमंत्री व पालकमंत्र्यांना निवेदन

**दैनिक युवक आधार**

**दिग्रस तालुका प्रतिनिधी उमेश साखरकर :** राज्यातील अनाथ मुलींचे भविष्य सुरक्षित करण्यासाठी आणि त्यांच्या विवाह कार्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने ५ लाख रुपयांच्या निधीची तरतूद करावी, तसेच 'मुख्यमंत्री लाडकी बहीण' योजनेच्या वंचित महिलांसाठी ई-केवायसी (e-KYC) करिता मुदतवाढ द्यावी, अशी महत्त्वपूर्ण मागणी शिवसेना उपजिल्हाप्रमुख डॉ. विष्णू उकंडे यांनी केली आहे.या संदर्भात डॉ. उकंडे यांनी नुकतीच राज्याचे माजी मुख्यमंत्री तथा उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची ठाणे येथील निवासस्थानी आणि यवतमाळचे पालकमंत्री तथा मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची मुंबईतील 'शिवनेरी' निवासस्थानी भेट घेऊन त्यांना सविस्तर निवेदन सादर केले.

निवेदनात डॉ. उकंडे यांनी यवतमाळ जिल्ह्यासह राज्यातील अनाथ मुलींच्या व्यथा मांडल्या. ज्या मुलींचे आई-वडील



हयात नाहीत किंवा हरवलेले आहेत, अशा अनाथ मुलींच्या विवाहाचा प्रश्न अत्यंत गंभीर झाला आहे. आर्थिक पाठबळ नसल्यामुळे अशा मुलींशी विवाह करण्यास कोणी सहजासहजी पुढे येत नाही. जर शासनाने या मुलींच्या विवाहासाठी ५ लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली, तर त्यांना त्यांचे भावी आयुष्य सन्मानाने जगण्यास मोठी मदत होईल, असे डॉ. उकंडे यांनी यावेळी आवर्जून सांगितले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी सुरू केलेली 'मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना' ही अत्यंत महत्त्वाकांक्षी असून तिचा लाभ लाखो महिलांना मिळत आहे. मात्र, तांत्रिक कारणांमुळे किंवा माहितीअभावी अनेक पात्र महिला अद्याप ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करू शकलेल्या नाहीत. अशा महिलांना योजनेच्या लाभापासून वंचित राहू नये म्हणून ई-केवायसीसाठी विशेष मुदतवाढ देण्यात यावी, अशी विनंतीही या निवेदनाद्वारे करण्यात आली.

डॉ. विष्णू उकंडे यांनी मांडलेल्या या दोन्ही मागण्यांची उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि मंत्री संजय राठोड यांनी दखल घेतली आहे. अनाथ मुली आणि गरजू महिलांच्या हितासाठी शासन सकारात्मक पाऊल उचलणार असून, या निवेदनावर तातडीने शिफारस करून योग्य तो मार्ग काढला जाईल, असे आश्वासन दोन्ही नेत्यांनी यावेळी दिले.

# ऑनलाइन आरटीओची लूट सुरू; अधिकाऱ्यांचे एजंटशी डील, जनतेचे नुकसान!

**आरटीओ सेवा 'ऑनलाइन' झाल्या तरी नागरिकांचे हेलपाटे सुरूच; तांत्रिक खोडे, अपूर्ण प्रक्रिया आणि पडद्यामागील भ्रष्टाचाराने शासनाची 'डिजिटल स्वप्ने' धुळीला!**

**दैनिक युवक आधार**

**निलेश फुंडे /अलिबाग रेवदंडा प्रतिनिधी :** सरकारने आरटीओच्या १०५ हून अधिक सेवा 'सारथी' आणि 'वाहन ४.०' या डिजिटल प्लॅटफॉर्मवर आणून 'ना हेलपाटे, ना एजंट'चा जाहीर उद्देश साध्य करण्याचा दावा केला असला तरी प्रत्यक्षात नागरिक आरटीओ कार्यालयांच्या दारात हेलपाटे मारत आहेत. तांत्रिक अडचणी, अपूर्ण माहिती, गुंतागुंतीच्या प्रक्रिया आणि पडद्यामागील



कथित भ्रष्टाचारामुळे नागरिकांची गैरसोय कायम आहे. जनतेत जोरदार चर्चा आहे की, ऑनलाइन प्रक्रियाही अनैतिक पैशाच्या काळाबाजाराशिवाय चालू शकत नाही आणि आरटीओ अधिकाऱ्यांवर खासगी एजंट्सशी 'गुप्तगु' होत असल्याच्या तक्रारींनी हवा भरली आहे. शासन ठोस पावले उचलणार की जनतेची एजंट्सच्या लुटारू हातात सुपूर्द करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

ड्रायव्हिंग लायसन्स, वाहन नोंदणी, नूतनीकरण, पत्ता बदल, डुप्लिकेट आरसी, ई-चलान भरणे, वाहन मालकी हस्तांतरण अशा महत्त्वाच्या सेवा ऑनलाइन उपलब्ध असल्या तरी अर्ज भरल्यानंतर कागदपत्र पडताळणी, बायोमेट्रिक नोंदणी, फोटो-सवाक्षरी किंवा अंतिम मंजुरीसाठी प्रत्यक्ष उपस्थिती सक्तीची आहे. 'सारथी' पोर्टलवर लर्निंग लायसन्स आणि कायमस्वरूपी लायसन्ससाठी स्लॉट मिळवणे कठीण, वेबसाइट मंद गतीने चालते, पेमेंट फेल होते किंवा अर्ज सबमिटच होत नाही. परिणामी नागरिकांना पुन्हा आरटीओत धाव घ्यावी लागते. 'वाहन ४.०'वर वाहन ट्रान्सफर, फिटनेस प्रमाणपत्र, परवाने किंवा हायपोथेक (कर्ज) काढण्यासाठी वाहनाची प्रत्यक्ष तपासणी आवश्यक असते. अशा प्रक्रियांमुळे 'घराबसल्या सेवा' केवळ कागदावर राहिल्या आहेत.

आरटीओ कार्यालयांमध्ये तांत्रिक हेल्पडेस्क अपुरे असल्याने मार्गदर्शनच मिळत नाही. ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील लोकांसाठी ही प्रक्रिया अशक्यप्राय ठरते. कागदपत्रांची अचूक माहिती नसल्याने अर्ज नाकारले जातात, पुन्हा सुरू करावे लागते किंवा एजंटची मदत घ्यावी लागते. एजंट्स अतिरिक्त शुल्क उधळतात, असा आरोप आहे. जनतेत चर्चा आहे की, आरटीओ अधिकाऱ्यांवर खासगी एजंट्सशी पडद्यामागे 'गुप्त करार' असल्याने ऑनलाइन प्रक्रियाही अडवली जाते. "अनैतिक पैशाचा काळाबाजार थांबला नाही तर सुधारणा शक्य नाही," असे अनेक नागरिक सांगत आहेत.

तज्ज्ञ म्हणतात, डिजिटल प्रणाली पारदर्शकता आणि वेग वाढवू शकते, पण पोर्टलची कार्यक्षमता सुधारणे, स्लॉट वाढवणे, हेल्पडेस्क मजबूत करणे आणि भ्रष्टाचारावर कारवाई आवश्यक आहे.

अन्यथा शासनाचे 'डिजिटल आरटीओ' स्वप्न फसवे ठरेल आणि नागरिक एजंट्सच्या लुटारपटात सापडत राहतील.

रायगड जिल्ह्यातील आरटीओ कार्यालयांबाबतही अशाच तक्रारी आहेत – यावर शासन कधी ठोस कारवाई करणार?

# अनधिकृत होर्डिंगवर 'सिडको' ची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**पनवेल, ( वार्ताहर ) :** पावसाळ्यात वादळी वाऱ्यांमुळे अवाढव्य जाहिरात होर्डिंग कोसळण्याचे प्रकार घडू नयेत यासाठी 'सिडको'ने अनधिकृत होर्डिंग विरोधात कठोर भूमिका घेत, सदरचे होर्डींग जमीनदोस्त करण्याची कारवाई हाती घेतली. त्यामुळे अनधिकृतपणे होर्डींग उभारुन बेकायदेशीररित्या जाहिरातबाजी करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.'सिडको' च्या हद्दीत नैनासह इतर भागामध्ये 'सिडको'च्या नियमावलीचे उल्लंघन करुन तसेच कोणतीही अधिकृत परवानगी न घेता अनेक ठिकाणी अवाढव्य असे जाहिरात होर्डीग उभारण्यात आले आहेत. सदरचे होर्डीग महामार्गालगत असल्याने वादळी वाऱ्याच्या काळात ते अपघाताला कारणीभूत ठरु शकतात. सदरचा धोका ओळखून 'सिडको'च्या अनधिकृत बांधकामे (नैना)



विभागामार्फत विनापरवाना उभारण्यात आलेले अवाढव्य जाहिरात फलक हटविण्याची कारवाई करण्यात आली. मुंबई-राष्ट्रीय महामार्गालगत पनवेल पळस्पे येथील खंडोबा हॉटेलसमोर तसेच अरिहंत बिल्डिंग जवळ उभारलेल्या अनधिकृत जाहिरात फलकधारकांना महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन-नगररचना अधिनियम, १९६६ अंतर्गत नोटिसा बजावण्यात आल्या होत्या. मात्र, संबंधितांनी फलक न काढल्याने अखेर 'सिडको' ने निष्कासन मोहीम राबवत सदर फलक हटवले. सदर कारवाई मुख्य दक्षता अधिकारी तथा पोलीस उपमहानिरीक्षक सुरेश मेंगडे यांच्या निर्देशानुसार आणि मुख्य नियंत्रक (अनधिकृत बांधकामे-नैना) प्रशांत भांगरे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या मोहिमेत अतिक्रमण विभागाचे दत्तात्रय चौरे, जितेंद्र परदेशी, भूमापक शिवराज चव्हाण, स्थानिक पोलीस, सिडको पोलीस पथक, महावितरण अधिकारी, सिडको सुरक्षा रक्षक तसेच महाराष्ट्र सुरक्षा मंडळाच्या कर्मचाऱ्यांचा सहभाग होता.

# शाळेच्या एकूण प्रगतीसाठी लोकसहभाग महत्वाचा- सचिव दत्तात्रेय जोंधळे

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी** : शिक्षण क्षेत्रामध्ये शिक्षकांनी मनापासून योगदान द्यावे तसेच विद्यार्थी व पालक यांच्या गृहभेटीद्वारे संपर्कात राहून वेळ व कामकाजाचे नियोजनाबरोबरच विद्यार्थ्यांना केंद्रास्थानी ठेवून आपण त्यांच्यासाठी दिलेले शिक्षण क्षेत्रातील योगदान हे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी अमुलाग्र असून शाळेच्या एकूण प्रगतीसाठी लोकसहभाग महत्वाचा असल्याचे प्रतिपादन महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे संस्थेचे कार्याध्यक्ष तथा सचिव दत्तात्रेय जोंधळे यांनी न्यू इंग्लिश स्कूल, पालखेड विद्यालयात सदिच्छा भेटीप्रसंगी केले.



यावेळी व्यासपीठावर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे, मुख्याध्यापक अशोक शेळके आदी होते.

पुढे बोलतांना जोंधळे यांनी शाळेची प्रगती,विद्यार्थी उपस्थिती, निकाल,राबविले जाणारे नावीन्यपूर्ण उपक्रम,विद्यार्थांचा स्पर्धा परीक्षांतील सहभाग आदी मुद्द्यांबाबत समाधान व्यक्त केले.

त्यानंतर महाराष्ट्र शिक्षण संस्थेचे उपाध्यक्ष निवृत्तीनाना थेटे यांनी शाळेच्या आजपर्यंत झालेल्या प्रगतीसाठी सर्वांनी घेतलेले कष्ट यांबरोबर आयुष्यातले विविध मौलिक अनुभव व प्रसंग आपल्या मनोगतातून सांगितले.मुख्याध्यापक अशोक शेळके यांनी शाळेच्या प्रगतीचा उंचावणारा आलेख,माजी विद्यार्थ्यांची मदत,आगामी शैक्षणिक वर्षासाठी नूतन विद्यार्थी प्रवेश आदींसह विविध स्वरूपाची माहिती उपस्थितांना दिली.याप्रसंगी मुख्याध्यापक अशोक शेळके,निलेश गवांदे, दीपक देशमुख, हेमंतकुमार होलगडे, सुनंदा दुर्धवळे ,संजय लव्हांगडे, मंगेश कागदे, शैलेश शिखरे, किरण थेटे,राहुल दवते,वैशाली मोते,सागर जाधव,राजेंद्र नाठे, संदीप आहेर, दत्तात्रय पगार, सावन जाधव,संजय कोकतरे, कविता ढोमसे,सारिका पवळे,सुरेश गांगुर्डे, रामदास पवार,नदीम तांबोळी आदींसह विद्यार्थी उपस्थित होते,सूत्रसंचालन दत्तात्रेय पगार यांनी केले.

# लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृतमहोत्सवी वर्षनिमित्त पनवेलमध्ये ७५ अभंगांचे भव्य लोकार्पण

## भक्ती, संगीत आणि संस्कृतीचा सुरेल संगम

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)** : थोर दानशूर व्यक्तिमत्व आणि माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अमृत महोत्सव वर्षानिमित्त पनवेलमध्ये 'अप्रचलित रागांवर आधारित ७५ अभंगांचे' भव्य लोकार्पण अत्यंत उत्साहात, दिमाखात आणि आध्यात्मिक वातावरणात पार पडले. श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि नाद ब्रह्म साधना मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या कार्यक्रमाने पनवेलच्या सांस्कृतिक परंपरेत एक उल्लेखनीय भर घातली.

मार्केट यार्ड येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात पार पडलेल्या या सोहळ्याला विविध क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती लाभली. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी लोकनेते रामशेठ ठाकूर होते. प्रमुख पाहुणे म्हणून भाजपचे महाराष्ट्र प्रदेश सचिव आमदार प्रशांत ठाकूर, पनवेल महानगरपालिकेचे महापौर नितीन पाटील, मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, ज्येष्ठ नेते वाय. टी. देशमुख, गुरुवर्य पं. निवृत्तीबुवा चौधरी, नाद ब्रह्म साधना मंडळाचे अध्यक्ष वसंत पाटील तसेच रायगड भूषण पं. उमेश चौधरी आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.




दीपप्रज्वलनाने कार्यक्रमाची मंगल सुरुवात झाली. त्यानंतर ७५ अभंगांचे लोकार्पण करण्यात आले. अप्रचलित आणि अनवट रागांवर आधारित सादर करण्यात आलेल्या या अभंगांनी उपस्थित रसिकांना मंत्रमुग्ध केले. शास्त्रीय संगीताची गोडी आणि भक्तीभाव यांचा सुंदर संगम अनुभवायला मिळाल्याने संपूर्ण सभागृह भक्तिरसात न्हाऊन निघाले.

मान्यवरांनी आपल्या मनोगतात या उपक्रमाचे कौतुक करत भारतीय शास्त्रीय संगीत परंपरेच्या जतन व संवर्धनासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित केली. नवोदित कलाकारांना प्रेरणा आणि योग्य दिशा देणारा हा उपक्रम ठरेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

भजनसम्राट पं. निवृत्तीबुवा चौधरी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या या उपक्रमांतर्गत अभंगांची चित्रफीत सामाजिक माध्यमांवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यामुळे विद्यार्थी, शिष्यवर्ग आणि संगीत अभ्यासकांना रागांची शास्त्रशुद्ध ओळख होण्यास मोठी मदत होणार आहे. भारतीय शास्त्रीय संगीताच्या परंपरेतील रागसंवर्धन आणि सातत्यपूर्ण जतन हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असून, या माध्यमातून भक्ती, संस्कार आणि संगीत यांचा सुंदर संगम समाजास अनुभवता येणार आहे.

हा सोहळा केवळ लोकार्पणापुरता मर्यादित न राहता पनवेलच्या सांस्कृतिक इतिहासात एक अविस्मरणीय ठसा उमटवणारा ठरला. अमृत महोत्सव वर्षाला या उपक्रमामुळे एक विशेष सांस्कृतिक आणि आध्यात्मिक अधोरेखा लाभली आहे.

> पैसा संपत्तीने फुगलेले मी हजारो माणसे बघितले आहेत मात्र लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्याकडे सर्व असतानाही त्यांचे पाय जमिनीवर आहेत लोकांची सदैव सेवा करणे आणि लोकांमध्ये मिळून मिसळून राहणे हा त्यांचा स्थायीभाव आहे त्यामुळे ते फक्त लोकनेताच नाही तर लोकसेवक आहेत. आजपर्यंत प्रचलित रागांवर आधारित रचना आहेत पण अप्रचलित रागांवर या रचना अभंग तयार करण्यात आले आहेत त्यामुळे हे अप्रचलित राग संगीतातील डॉक्टरेट पदवीसाठी उपयुक्त ठरणार आहेत.
>
> - भजन सम्राट पं. निवृत्तीबुवा चौधरी

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे औक्षण करून त्यांना शतायुषी शुभेच्छा देण्यात आल्या. आपल्या मनोगतात त्यांनी या आध्यात्मिक कार्यक्रमाच्या आयोजनाबद्दल कौतुक व समाधान व्यक्त करत आयोजकांचे आभार मानले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मच्छिन्द्र पाटील यांनी केले.

# परतवाडा प्रकरणाला वेग: "पीडितांनी पुढे येऊन पुरावे द्यावेत" – पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे विदर्भ संपादिका** : परतवाडा येथे घडलेल्या गंभीर गैरवर्तन प्रकरणात तपासाला वेग देत आरोपींना कठोर शिक्षा मिळवून देण्यासाठी प्रशासन सक्रिय झाले आहे. या पार्श्वभूमीवर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी पीडित महिलांनी निर्भयपणे पुढे येऊन आपली बयाणे व पुरावे सादर करण्याचे आवाहन केले आहे.

आज त्यांनी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयाला भेट देत संपूर्ण प्रकरणाचा आढावा घेतला. यावेळी पोलीस आयुक्त राकेश ओला तसेच जिल्हा पोलीस अधीक्षक विशाल आनंद यांच्यासह वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

तपासाची दिशा आणि आतापर्यंतची कारवाई



या प्रकरणात आतापर्यंत ८ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्या ताब्यातून ७ मोबाईल, १ टॅब, लॅपटॉप आणि हार्ड डिस्क जप्त करण्यात आली आहे. या सर्व उपकरणांची फॉरेन्सिक तपासणी सुरू असून सोशल मीडियावर व्हायरल करण्यात आलेल्या व्हिडिओंचा तपास बारकाईने केला जात आहे. अशा प्रकारच्या व्हिडिओंचे प्रसारण रोखण्यासाठीही पोलिसांकडून कडक कारवाई केली जात आहे.

पीडितांच्या धैर्याला सलाम

या प्रकरणात एक १५ वर्षीय मुलगी पुढे येऊन बयाण दिल्याचे समोर आले असून, तिच्या संरक्षणासाठी व न्यायासाठी आवश्यक ती सर्व पावले उचलली जात असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. इतर पीडितांनीही पुढे येऊन सहकार्य केल्यास गुन्हा अधिक भक्कमपणे सिद्ध होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.

विशेष तपास पथक सक्रिय

घटनेचे गांभीर्य लक्षात घेता पोलीस विभागाने विशेष तपास पथक (SIT) स्थापन केले असून, जिल्हा आणि राज्य स्तरावर दररोज प्रकरणाचा आढावा घेतला जात आहे. आरोपींविरोधात ठोस पुरावे गोळा करून त्यांना कठोर शिक्षा मिळवून देण्यावर भर दिला जात आहे.

माध्यमांना जबाबदारीची जाणीव

या संवेदनशील प्रकरणावर विविध माध्यमांतून वृत्तांकन सुरू असल्याने पालकमंत्र्यांनी माध्यम प्रतिनिधींना सजगतेने बातम्या सादर करण्याचे आवाहन केले. धर्मांमध्ये तेढ निर्माण होऊ नये, सामाजिक सलोखा अबाधित राहावा आणि तपास दिशाभूल होऊ नये, यासाठी संयम राखणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

तसेच, माध्यमांकडे कोणतेही ठोस पुरावे असल्यास ते थेट पोलिसांकडे सुपूर्द करावेत, आणि पोलिसांकडून अधिकृतरीत्या देण्यात येणारी माहितीच ग्राह्य धरावी, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडवली असून, पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे स्पष्ट संकेत मिळत आहेत.

# मालेगाव चौकात महात्मा बसवेश्वर जयंती उत्साहात संपन्न

**दैनिक युवक आधार**
**अर्धापूर प्रतिनिधी अरविंद पांचाळ** : अर्धापूर तालुक्यातील मालेगाव येथील प्रमुख चौकात महात्मा बसवेश्वर यांच्या जयंतीनिमित्त कार्यक्रम मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महात्मा बसवेश्वर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले आणि परिसरात भक्तीमय व प्रेरणादायी वातावरण निर्माण झाले.

कार्यक्रमाची सुरुवात सकाळी मान्यवरांच्या हस्ते प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. त्यानंतर पुष्पहार अर्पण करत महात्मा बसवेश्वरांना अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विविध सामाजिक, राजकीय व शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ आणि युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांमध्ये गजानन तिमेवार, एकनाथ पाटील, अशोक स्वामी, मारोती बुट्टे, गोविंद कामेवार, मन्मथ राजेवर, बबलू तिमेवार, श्रीकांत राजेवर, सुमित सूर्यवंशी, किशोर ढवळे, कांबळे, खुणे आदींचा समावेश होता.



उपस्थित वक्त्यांनी आपल्या भाषणातून महात्मा बसवेश्वर यांच्या कार्याचा गौरव करत, त्यांनी दिलेला समता, बंधुता आणि सामाजिक न्यायाचा संदेश आजच्या काळात अत्यंत महत्त्वाचा असल्याचे अधोरेखित केले. समाजातील विषमता दूर करण्यासाठी आणि सर्वांना समान संधी मिळण्यासाठी त्यांच्या विचारांचे अनुसरण करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले.

कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी समाजात एकोपा व बंधुता वाढवण्याचा संकल्प केला. मालेगावच्या चौकात पार पडलेला हा जयंती उत्सव समाजात नवचैतन्य निर्माण करणारा ठरला.

# श्री संत भगवान बाबा व संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी येथे आज ह .भ .प .मंझरीकर महाराज यांचे किर्तन


**दैनिक युवक आधार**
**पाटोदा (प्रतिनिधी) :** बीड येथील श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी नगर रोड, बीड येथे संत वामनभाऊ, संत भगवान बाबा यांच्या कृपा आशिर्वादाने प्रतिवर्षी प्रमाणे या वर्षी ही संत वामनभाऊ, संत भगवान बाबा, संत तुकाराम, विठ्ठल-रूक्मिणि, हनुमान देवता मुर्ती प्राणप्रतिष्ठेच्या १४ व्या वर्धापन दिना निमित्त सर्व धर्म समभाव राष्ट्रीय एकात्मतेचे प्रतीक दिनांक १९/०४/२०२६



ते २१/०४/२०२६ या कालावधी मध्ये त्रिदिवशीय हरिनाम सप्ताहाचे आयोजन केले आहे. या सप्ताहाचे द्वितीय दिनी दिनांक २० एप्रील सोमवार रोजी रात्री ८:०० वा. ह.भ.प.ज्ञानेश्वर महाराज मंझरीकर (माऊली) यांचे हरिकिर्तन होईल. तरी बीड शहरातील व परीसरातील भाविक भक्तांनी किर्तन श्रावणाचा लाभ घ्यावा असे आवाहन या कार्यक्रमाचे आयोजक व श्री संत भगवान बाबा व श्री संत वामनभाऊ प्रतिष्ठान इंद्रप्रस्थ कॉलनी, बीड चे अध्यक्ष डॉ.राजेंद्र भाऊ सानप व प्रतिष्ठानचे सर्व सहकारी व इंद्रप्रस्थ कॉलनी,नगर रोड बीड व परिसरातील भाविक भक्तांनी केले आहे.

# पोलीस प्रशासन आणि बाल संरक्षण विभागाच्या सतर्कतेमुळे बाळवाडी येथील बालविवाह रोखला

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी / राजू गायकवाड (मोहदरी) :** पोफळी पोलीस स्टेशनच्या हद्दीतील बाळवाडी ता. पुसद येथे होणारा एक बालविवाह पोलीस प्रशासन आणि बाल संरक्षण विभागाच्या तत्परतेमुळे यशस्वीरित्या रोखण्यात आला आहे. कायद्याचे गांभीर्य लक्षात घेत दोन्ही कुटुंबांनी सामंजस्याने हा विवाह रद्द करण्याचा निर्णय घेतला.ग्राम बाळवाडी येथे एक बालविवाह पार पडणार असल्याची गोपनीय माहिती पोलीस प्रशासनाला मिळाली होती. घटनेचे



गांभीर्य ओळखून जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री. राजुरकर (यवतमाळ) यांना तात्काळ सूचित करण्यात आले. त्यानंतर पोलीस पथक आणि बाल संरक्षण विभागाने गावात धाव घेतली. स्थानिक प्रतिष्ठित नागरिक, पोलीस पाटील, ग्रामसेवक आणि अंगणवाडी सेविका यांच्या उपस्थितीत दोन्ही बाजूंच्या पालकांची तातडीची बैठक घेण्यात आली.

या बैठकीत पालकांना 'बालविवाह प्रतिबंधक कायद्या'तील कडक तरतुदी आणि बालविवाहाचे मुला-मुलींच्या आरोग्यावर होणारे दुष्परिणाम सविस्तरपणे समजावून सांगण्यात आले. कायदेशीर कारवाईची भीती आणि जबाबदारीची जाणीव होताच, वर व वधू पक्षाच्या पालकांनी संमतीने हा विवाह रद्द केला. बाल संरक्षण अधिकाऱ्यांनी यासंदर्भातील आवश्यक ती सर्व कायदेशीर प्रक्रिया जागीच पूर्ण केली. या मोहिमेत बाळवाडीतील ग्रामस्थांनी प्रशासनाला मोलाचे सहकार्य केले.सदर यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक श्री. कुमार चिंता, अपर पोलीस अधीक्षक श्री. थोरात आणि उपविभागीय पोलीस अधिकारी (SDPO) श्री. हनुमंत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. या पथकात पोफळीचे ठाणेदार निलेश शेंबडे, बीट जमादार किसन जाधव, जय राठोड, जिल्हा बाल संरक्षण अधिकारी श्री. राजुरकर, तालुका बाल सुरक्षा अधिकारी जयभये मॅडम व त्यांच्या कर्मचारी वर्गाचा समावेश होता.

# शिर्डी साईबाबा मंदिराचे सीईओ श्री.गोरक्ष गाडीलकर यांची पनवेलच्या श्री.साईबाबा मंदिराला भेट

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी** - शिर्डी साईबाबा मंदिराचे मुख्य कार्यकारी अधिकारी (CEO) श्री.गोरक्ष गाडीलकर यांनी पनवेलच्या श्री.साईबाबा मंदिराला भेट दिली.

यावेळी त्यांनी सद्गुरु श्री साई नारायण बाबा आश्रम,श्री भगवती साई संस्थान पनवेलच्या श्री. साईबाबा मंदिराची पाहणी केली. मंदिरातील श्री साईबाबा आणि नारायण बाबा यांचे दर्शन घेतले.



यावेळी त्यांनी बोलताना,आपण सर्वजण एकाच परिवारातील आहोत.श्री साईबाबा यांचे कार्य आपण पुढे घेऊन चालत आहोत. तुम्ही कोणतीही सेवा करा, पण ती श्रद्धापूर्वक केली पाहिजे. शिर्डी येथे जगातल्या कानाकोपऱ्यातून साईभक्त दर्शनासाठी येतात. श्री साईबाबांची जे भक्त सेवा आणि भक्ती करतात, त्यांना निश्चितच आशीर्वाद मिळतो. मंदिराच्या एकूण कामकाजाबद्दल त्यांनी खूप समाधान व्यक्त केले. श्री.साईबाबा मंदिराच्यावतीने कोऑर्डिनेटर राम थदानी यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोरक्ष गाडीलकर यांच्यासह त्यांच्या कुटुंबीयांचे स्वागत केले.यावेळी मंदिराविषयी सविस्तर माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी यांना देण्यात आली.

# नाना पाटील ठाले यांच्या पाठपुराव्याला यश; बोदवडचा पाणीप्रश्न मार्गी

**दैनिक युवक आधार**
**योगेश पालोदकर**
**सिल्लोड:-**तालुक्यातील बोदवड येथे गेल्या महिनाभरापासून सुरू असलेली पाणीटंचाई प्रशासनाने अखेर दूर केली आहे. माजी सरपंच नाना पाटील ठाले यांच्या पाठपुराव्याला यश आले असून, सभापती अनिता सुरेश बनकर यांच्या निर्देशानंतर बोदवड गावाला टँकरद्वारे पाणीपुरवठा सुरू झाला आहे.



बोदवड गावात निर्माण झालेल्या गंभीर पाणीटंचाईकडे नाना पाटील ठाले यांनी प्रशासनाचे लक्ष वेधले होते. या मागणीची तातडीने दखल घेत सभापती अनिता सुरेश बनकर यांनी संबंधित अधिकाऱ्यांना कार्यवाहीचे निर्देश दिले. प्रशासनाच्या तत्परतेमुळे बोदवडकरांची तहान भागली असून, पाणीपुरवठा सुरळीत झाला आहे. या प्रश्नासाठी नाना पाटील ठाले यांनी केलेल्या विशेष नियोजनाबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे व त्यांच्या मित्रमंडळाचे आभार मानले आहेत.

# उपक्रमशील मुख्याध्यापक जावेद खान पठाण यांना राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार

**दैनिक युवक आधार**
**सेलू (प्रतिनिधी) शिवाजी पवार** : गौरव सेवा संस्था संचलित यासेर उर्दू प्राथमिक शाळा, सेलू येथील उपक्रमशील मुख्याध्यापक जावेद खान फेरोज खान पठाण यांना सूरज्या शिक्षक संघटना, महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने देण्यात येणारा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले.



हा पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते एका भव्य कार्यक्रमात प्रदान करण्यात आला. यावेळी व्यासपीठावर संघटनेचे राज्य अध्यक्ष प्रवीण जोंधळे सर, पी.एस. आय. डोंबे सर, प्राचार्य विशाखा मॅडम तसेच जिल्हा परिषदेचे नव्याने नियुक्त सदस्य व शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते.जावेद खान पठाण यांनी शैक्षणिक क्षेत्रात राबविलेल्या विविध उपक्रमांची दखल घेत, त्यांच्या उत्कृष्ट कार्याची पावती म्हणून त्यांना हा सन्मान देण्यात आला. महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांमधून निवड झालेल्या शिक्षकांना यावेळी राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्काराने गौरविण्यात आले. कार्यक्रमाला राज्यभरातून मोठ्या संख्येने शिक्षक उपस्थित होते. अत्यंत उत्साहपूर्ण आणि दिमाखदार वातावरणात हा पुरस्कार वितरण सोहळा संपन्न झाला.

# जिल्ह्यातील नागरिकांनी स्वगणना करण्याचे जिल्हाधिकारी यांचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**दिलीप कराळे/प्रतिनिधी** : भारत सरकारकडून यंदा देशाची 16 वी जनगणना राबवली जात आहे. ही जनगणना विशेष आहे कारण यावेळी 'डिजिटल सेन्सस' आणि 'स्व-गणना' ही सुविधा पहिल्यांदाच दिली जात आहे. अकोला जिल्ह्यातील नागरिकांनी स्वगणना सुविधेचा लाभ घेऊन नोंदणी करावी, असे आवाहन जिल्हाधिकारी वर्षा मीना यांनी आज केले.

स्व-गणना म्हणजे काय? आपण स्वतः आपल्या मोबाईल किंवा संगणकावरून जनगणनेच्या पोर्टलवर आपल्या कुटुंबाची संपूर्ण माहिती भरू शकतो. यासाठी आधार कार्ड, मोबाईल नंबर यापैकी एकाच्या आधारे लॉगिन करावे लागेल. स्व-गणना कालावधी हा दिनांक 01 मे 2026 ते दिनांक 15 मे 2026 असा आहे, ही प्रक्रिया पूर्णपणे सुरक्षित आणि गोपनीय आहे.

अकोला जिल्ह्यातील शहरी व ग्रामीण भागातील सर्व नागरिक, विशेषतः तरुण, शिक्षित बांधवांनी पुढाकार घेऊन स्वतःची व आपल्या कुटुंबाची माहिती स्व-गणनेद्वारे भरावी, असे आवाहन जिल्हाधिकारी यांनी केले.

सामान्य नागरिकांना स्व-गणना करुन जनगणनेच्या कार्यात प्रत्यक्ष सहभागी होता येणे शक्य होईल. जनगणनेच्या कार्याकरिता अकोला जिल्हयातील ग्रामीण व नगरपरिषद शहरी क्षेत्रात एकुण 2 हजार 338 घरयादी गट बनविण्यात आले असुन एक घरयादी गट हा जवळपास 180-200 घरे किंवा 650 ते 800 लोकसंख्येपासुन तयार केला जातो. याकरिता एकुण 2 हजार 614 प्रगणक तसेच प्रत्येक 6 प्रगणकांकरिता 1 याप्रमाणे एकूण 426 पर्यवेक्षक यांच्या नियुक्त्या करण्यात आल्या आहेत. प्रगणक व पर्यवेक्षक यांचे प्रशिक्षण दिनांक 23 एप्रिलपासून दिनांक 8 मे या कालावधीत चार्ज अधिकारी स्तरावर घेण्यात येणार आहे.

जे नागरिक तंत्रज्ञान वापरू शकत नाहीत, ज्येष्ठ नागरिक, किंवा ज्यांच्याकडे मोबाईल नाही, त्यांच्यासाठी प्रशिक्षित प्रगणक दिनांक 16 मे ते दि 14 जुन या कालावधीत प्रत्येक घरी भेट देऊन ॲपद्वारे माहिती नोंदवतील.

जनगणनेतून मिळालेली आकडेवारी पुढील 10 वर्षांसाठी शाळा, दवाखाने, रस्ते, रेशन, पाणीपुरवठा, रोजगार योजना यांचे नियोजन ठरवते. तुमची एक अचूक नोंद म्हणजे अकोला जिल्ह्याच्या विकासाला हातभार आहे. तेव्हा 01 मे 2026 पासून सुरू होणाऱ्या स्व-गणना टप्प्यात सहभागी व्हा. काही अडचण आल्यास आपले तालुक्यातील तहसिल कार्यालय तसेच नगरपरिषद/ नगरपंचायत कार्यालयाशी संपर्क साधा, असे त्यांनी सांगितले.सर्वांनी जनगणनेच्या राष्ट्रीय कार्यात सहभाग नोंदवुन जनगणनेतुन जनकल्याण हे ब्रीद सार्थ ठरवु या व अकोला जिल्ह्याची जनगणना 100 टक्के यशस्वी करूया, असे आवाहन त्यांनी केले

### युगपुरुष डॉ. बाबासाहेब आंबेडकर !

बाबा,तू बॅरिस्टरी शिकुन युरोपात,
येधंआंधळ्यास दाविला उजेडाचा झोत!
शेकडो पिढ्यांचे फेडलेस पांग।
उपकार किती तुझे वर्णू सांग?
अभ्यासू लेखनीस लाऊनी धार,
अन्यायावरी केले विवेकी प्रहार।
खुले केले तू सर्वांस पाणी चवदार।
बाबा,तुझ्याविन कोण झेलले असते भयानक वार?
काळजाचा करुनी कोट,
भिडलास तू विषमतेशी सरळसोट ।
बाबा,तु युगपुरुष!
पचवूनीअन्याय हजार,
नाही सोडिला तू मानवतेचा कैवार!
आज कोटी कोटी वंदिती तुला जोडूनी दोन्ही कर ।
स्त्री, शुद्रांचा तूच तारणहार,
माणुसकी जपत सर्वांप्रति गहिवर।
आम्हांसाठी तू सर्व देवांचा 'अवतार '।
तुझ्यामागे आम्ही झालो निराधार
परि दिलेस तू बलशाली संविधान,
तेच ठरेलआता आमचं भविष्य अन् वर्तमान!
बाबा तू युगपुरुष ।।

# एनएमएमटीच्या ठोक मानधन कर्मचाऱ्यांना एकरकमी 7000 रुपयांची भरघोस पगार वाढ!

**वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या आदेशान्वये परिवहन समितीचा निर्णय पुढील प्रत्येक वर्षी एक हजाराची वेतनात पडणार भर मेडिक्लेमची रक्कम तीन लाखांवरून पाच लाख रुपये झाली**

**दैनिक युवक आधार**
**नवी मुंबई प्रतिनिधी** : नवी मुंबई महापालिका परिवहन सेवेमध्ये कार्यरत ठोक मानधन तत्वावरील वाहन, चालक, अभियंते अशा सर्व संवर्गातील कामगारांसाठी आजचा दिवस आनंदाचा दिवस ठरला आहे. वनमंत्री नामदार गणेश नाईक यांच्या आदेशानुसार आणि श्रमिक सेना युनियनचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली या कर्मचाऱ्यांना 7000 रुपये एक रकमी भरघोस वेतनवाढ करण्याचा निर्णय आज झालेल्या परिवहन समितीच्या बैठकीमध्ये मंजूर करण्यात आला आहे. याशिवाय प्रत्येक वर्षी या कर्मचाऱ्यांना एक हजार रुपयांची वेतनवाढ मिळणार आहे. वैद्यकीय विम्याची रक्कम जी यापूर्वी तीन लाख रुपये होती ती वाढवून पाच लाख रुपये करण्यात आली आहे. माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक यांचा आज वाढदिवस होता. या वाढदिवशी ठोक मानधन कर्मचाऱ्यांसाठी हे आनंद वर्तमान






मिळाले आहे. परिवहन समिती सभापती विकास झंजाड यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये परिवहन समिती सदस्य राहुल शिंदे यांनी हा वेतन वाढीचा महत्त्वपूर्ण ठराव मांडला. तो सर्वानुमते मंजूर करण्यात आला. परिवहन सेवेमध्ये विविध संवर्गात सुमारे 1500 कर्मचारी गेली अनेक वर्षे कार्यरत आहे

मागील सहा वर्षे त्यांना वेतन वाढ मिळालेली नव्हती. या कर्मचाऱ्यांनी वनमंत्री नामदार गणेश नाईक यांना वेतन वाढीसाठी साकडे घातले होते. श्रमिक सेना युनियनने या कर्मचाऱ्यांच्या वेतन वाढीची मागणी परिवहन प्रशासन आणि महापालिका प्रशासनाकडे लावून धरली होती. श्रमिक सेनेचे सरचिटणीस चरण जाधव आणि कामगार प्रतिनिधी हे श्रमिक सेनेचे अध्यक्ष डॉक्टर संजीव नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली यासाठी पाठपुरावा करीत होते. मागील अनेक वर्षे 24 हजार मासिक ठोक मानधनावर हे कर्मचारी काम करत होते. या कर्मचाऱ्यांचे वेतन वाढविण्याचा आदेश नामदार गणेश नाईक यांनी परिवहन समितीच्या पदाधिकाऱ्यांना दिले होते. त्यानुसार आजच्या बैठकीमध्ये याबाबतचा निर्णय घेण्यात आला. या निर्णयामुळे या कर्मचाऱ्यांचे वेतन आता 24 हजारावरून 31 हजार होणार आहे. याशिवाय दरवर्षी एक हजार रुपये वेतनामध्ये भर पडणार आहे. आमच्या जीवनामध्ये आर्थिक स्थैर्य निर्माण करणाऱ्या वेतन वाढीच्या निर्णयाबद्दल या ठोक मानधनावरील कर्मचाऱ्यांनी वनमंत्री नामदार गणेश नाईक, श्रमिक सेनेचे अध्यक्ष तथा माजी खासदार डॉक्टर संजीव नाईक, महापालिकेचे सभागृह नेते सागर नाईक, महापालिका प्रशासन, परिवहन महाव्यवस्थापक आणि परिवहन समितीचे आभार व्यक्त केले आहेत.

# गोंदिया: प्रतिबिंब संस्थेतर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्साहात साजरी

**दैनिक युवक आधार**
**सचिन बन्सोड गोंदिया जिल्हा (प्रतिनिधी)**:स्थानिक मरारटोली भागातील अग्रगण्य सामाजिक संस्था 'प्रतिबिंब सामाजिक बहुदेशीय संस्था' च्या वतीने, भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, विश्वरत्न परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य अभिवादन कार्यक्रम व अल्पोपहार वाटपाचे आयोजन करण्यात आले होते. संस्थेचे अध्यक्ष तथा धडाडीचे तरुण समाजसेवक मिथुन इंद्रकुमार मेश्राम यांच्या प्रमुख उपस्थितीत आणि मार्गदर्शनाखाली हा स्तुत्य उपक्रम राबविण्यात आला.



सामाजिक बांधिलकीचा वारसा

मिथुन मेश्राम यांनी आपल्या भाषणातून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचा संकल्प व्यक्त केला. ते म्हणाले की:

"केवळ उत्सव साजरा करणे नव्हे, तर बाबासाहेबांचे 'शिक्षण, संघटन आणि संघर्ष' हे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवणे हीच खरी आदरांजली ठरेल."

त्यांच्या या आक्रमक आणि विधायक नेतृत्वामुळे गोंदियातील सामाजिक चळवळीत प्रतिबिंब संस्थेचे नाव आज अग्रक्रमाने घेतले जात आहे.

कार्यक्रमाची रूपरेषा

कार्यक्रमाची सुरुवात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला माल्यार्पण व दीपप्रज्वलन करून करण्यात आली. यावेळी परिसरातील नागरिक व कार्यकर्त्यांनी मोठ्या संख्येने उपस्थिती लावली होती. जयंतीच्या उत्सवाचे औचित्य साधून उपस्थित जनसमुदायाला संस्थेच्या वतीने दर्जेदार अल्पोपहाराचे वाटप करण्यात आले. विशेष म्हणजे, या स्टॉलचे उद्घाटन गोंदियाचे तहसीलदार समशेर पठाण व अप्पर तहसीलदार श्रीकांत कांबळे यांच्या हस्ते करण्यात आले.

अग्रणी नेतृत्व: मिथुन मेश्राम

गोंदियातील सामाजिक कार्याचा वसा घेतलेले मिथुन मेश्राम हे सातत्याने जनहिताचे प्रश्न सोडवण्यासाठी झटत आहेत. त्यांच्या नेतृत्वात 'प्रतिबिंब संस्था' केवळ सांस्कृतिक कार्यक्रमच नव्हे, तर शैक्षणिक आणि आरोग्य क्षेत्रातही महत्त्वपूर्ण योगदान देत आहे. त्यांच्या या कार्यामुळे संपूर्ण जिल्ह्यातून त्यांच्यावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# चला महामानवास अभिवादन करूया; १८ तास अभ्यास उपक्रम उत्साहात संपन्न"

**दैनिक युवक आधार**
**अर्धापूर प्रतिनिधी - अरविंद पांचाळ** : अर्धापूर नगरीत "चला महामानवास अभिवादन करूया, १८ तास अभ्यास करूया" या संकल्पनेतून आयोजित विशेष शैक्षणिक उपक्रम आज सकाळी ६ ते रात्री १२ वाजेपर्यंत उत्साहात पार पडला. या उपक्रमामध्ये विद्यार्थ्यांसाठी अभ्यास सत्रासोबतच निबंध स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, प्रज्ञाशोध परीक्षा अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमादरम्यान पत्रकार आनंद मोरे व ॲड. दिलीप मोरे या बंधूंनी क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले, सावित्रीबाई फुले तसेच विश्ववंदनीय, विश्वरत्न, परमपूज्य बोधिसत्व, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावरील ग्रंथ विद्यार्थ्यांना भेट स्वरूपात प्रदान केले.

कार्यक्रमाला सकाळपासून अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावून विद्यार्थ्यांना प्रोत्साहन दिले. यामध्ये अर्धापूरचे



नगराध्यक्ष प्रवीणजी देशमुख, माजी नगराध्यक्ष छत्रपती कानोडे, नगरसेवक सोनाजी विठ्ठलराव सरोदे, दाभड नगरीचे उपसरपंच तथा पत्रकार अरविंद पांचाळ , लक्ष्मीकांत गुरु मुळे, गुणवंत वीरकर, शेख जुबेर, शेख वसीम, आनंद शिनगारे, पत्रकार संदीप राऊत, अशोकराव आठवले, माजी नगराध्यक्ष सौ. प्रणिता सरोदे, माजी नगरसेवक नवनाथ बारसे, व्यंकटी राऊत, योगेश हळदे, प्रा. तानाजी मेटकर, राजेश्वर देशमुख, राजेंद्र साबळे, राजेश माटे, साहेबराव लोखंडे आदींचा समावेश होता.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जयंती मंडळाचे अध्यक्ष उमाकांत उर्फ उमेशभाऊ सरोदे यांच्यासह सुशांत कांबळे, विलास सरोदे, सचिन कीर्तने, प्रकाश सरोदे, पत्रकार गुणवंत सरोदे, जयभीम सरोदे, सिद्धार्थ कांबळे, गोविंद सरोदे, मारुती कांबळे, संकेत गजभारे, भीमराव कांबळे, संतोष बहादुरे, प्रवेश सरोदे, अनिल सरोदे, राजेंद्र कांबळे, विठ्ठल सरोदे, सुरज सरोदे, रवींद्र शेळके, धम्मपाल सरोदे, गौतम सरोदे, राजू मोरे तसेच भीम जयंती मंडळाच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

सकाळच्या सत्रात राष्ट्रपाल सोनाजी सरोदे यांच्या वतीने विद्यार्थ्यांना अल्पोहार देण्यात आला. त्यानंतर जयंती मंडळातर्फे भोजन, तसेच रुपेश कांबळे यांच्या वतीने खीर वाटप करण्यात आले.

पुढे सागर भाऊ यांच्या वतीने माठा (मजा) देण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात त्रिशरण पंचशील ग्रहण करून करण्यात आली असून शेवटी राष्ट्रगीताने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये या उपक्रमामुळे अभ्यासाची प्रेरणा निर्माण झाल्याचे चित्र पाहायला मिळाले.

# आठवडी बाजार अंगावर बेतला

## टू व्हीलर गाडीने मागवून मारली ठोकर

## चित्रलेखा दिलीप आकरे यांचा उपचार दरम्यान मृत्यू

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे** : भंडारा तालुक्यातील पहेला येथील रहिवासी सौ. चित्रलेखा दिलीप आकरे आठवडी बाजार आणण्याकरता दिनांक 17 एप्रिल 2026 ला सायंकाळी 7 वाजता गेली असता रजत दलिराम चवळे वय 30 याने भरधाव वेगाने टू व्हीलर गाडी चालवून मागवून ठोकर मारल्याने चित्रलेखा दिलीप आकरे वय 50 जागीच गंभीर झाली .त्यामुळे तिला लगेच भंडारा येथील लक्स हॉस्पिटल



भंडारा येथे भरती करण्यात आले होते .दोन दिवसांच्या उपचारानंतर दिनांक 19 एप्रिल 2026 ला दुपारी 1 वाजता तिची प्राणज्योत मावळली त्यामुळे आकरे कुटुंबावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या पश्चात मुलगा विशाल, 4 मुली व पती बराच मोठा आप्तपरिवार आहे. त्यांच्या स्वभाव मनमिळाव असून त्यांच्या जाण्याने परिसरातील जनता शोकाकुल आहे. त्यांच्या पोस्टमार्टम करण्यात आला असून उद्या सकाळी 8 वाजता प्रेतयात्रा त्यांच्या घरून निघणार आहे.

# भीमजयंतीतून विचारांचा ज्वालामुखी ; भिसडे पाटील यांचे प्रभावी मार्गदर्शन

**दैनिक युवक आधार**
**करण धोंगडे वाशीम जिल्हा प्रतिनिधी** : मालेगाव तालुक्यातील मौजे कळमगव्हाण येथे दि. 18 एप्रिल रोजी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भव्य भीमजयंती सोहळा उत्साहात पार पडला. दिवसभर विविध उपक्रमांनी गावात सामाजिक जागर निर्माण झाला.सकाळी 9 ते 12 या वेळेत रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले, तर दुपारी 3 ते 6 दरम्यान भव्य मिरवणुकीने परिसर दणाणून गेला. सायंकाळी 8 वाजता महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध प्रेरणादायी वक्ते गोपाल भिसडे यांच्या व्याख्यानाने कार्यक्रमाची सांगता झाली.यावेळी बोलताना गोपाल भिसडे यांनी ठामपणे सांगितले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केवळ एका घटकासाठी नव्हे, तर समाजातील सर्व वंचित, शोषित घटकांसाठी आयुष्यभर संघर्ष केला. "शिका, संघटित व्हा, संघर्ष करा" हा त्यांचा मूलमंत्र विद्यार्थ्यांसाठी आजही मार्गदर्शक आहे. त्यांनी सिद्धार्थ कॉलेज व मिलिंद महाविद्यालय स्थापून गरीब व मागास विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाची दारे खुली केली.शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना त्यांनी सांगितले की, 1937 साली मुंबई विधिमंडळात खोत पद्धतीविरोधात विधेयक मांडून शेतकऱ्यांच्या शोषणाविरुद्ध आवाज उठवला. नदी जोड प्रकल्पाची संकल्पना मांडून शेती आणि ग्रामीण भागाच्या विकासाला दिशा दिली.



महिलांच्या सक्षमीकरणासाठी त्यांनी लिंगभेदाला आळा घालत नोकऱ्यांत समान संधी दिल्या. हिंदू कोड बिलाच्या माध्यमातून महिलांना संपत्तीत हक्क, घटस्फोटाचा अधिकार, दत्तक घेण्याचा हक्क, पोटगीचा अधिकार यांसारखे महत्त्वपूर्ण अधिकार मिळवून देण्याचा प्रयत्न केला. बिल मंजूर न झाल्याने त्यांनी कायदेमंत्रीपदाचा राजीनामा दिला, हे त्यांचे तत्त्वनिष्ठ नेतृत्व दर्शवते.

कामगारांसाठी 8 तास काम, 8 तास विश्रांती आणि 8 तास स्वतःसाठी हा नियम लागू करून साप्ताहिक सुट्टी, पगारी रजा आणि किमान वेतन कायद्याची अंमलबजावणी केली. त्यामुळे बाबासाहेब हे विद्यार्थी, शेतकरी, महिला आणि कामगारांचे खरे तारणहार आहेत, असे भिसडे यांनी प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाचे आयोजन सामाजिक कार्यकर्ते सुनील इंगळे यांनी केले. प्रास्ताविक ज्योतीताई इंगळे व मिलिंद इंगळे यांनी केले. कार्यक्रमास शेषराव नवले (ग्रामसेवक), सौ. सुनीता खंडारे (सरपंच), सविता जाधव (उपसरपंच), प्रदीप मोरे (माजी सरपंच), गजानन शिंदे, अनिल बोरकर, अमोल इंगळे, अंतकलाबाई इंगळे, निवृत्ती खंडारे, दत्ता इंगळे, नाना भाऊ खंडारे, जगण जाधव, भगवान कुटे, प्रशांत खरबळकर, शालिनीताई मोरे, अशोक इंगळे, मिलिंद कांबळे आदींसह अनेक मान्यवर व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मिलिंद इंगळे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनील इंगळे यांनी केले. पंचशील नवयुवक महिला मंडळाच्या वतीने सर्वांचे आभार मानण्यात आले. कार्यक्रमास ग्रामस्थ व युवा कार्यकर्त्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# कुंवारा भीमसेन आदिवासी लोककला सांस्कृतिक प्रदर्शनाचे थाटात उद्घाटन

■ आदिवासी समाजाच्या सांस्कृतिक धरोहराला

■ चालना देण्यासाठी कुंवारा भिवसेन महोत्सव

■ वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल

**दैनिक युवक आधार**

**राहुल मडावी नागपूर :** आदिवासी समाजाने आजही आपली नाळ मूळ सांस्कृतिक धरोहराशी तुटू दिली नाही. आपल्या संस्कृतीचा अमूल्य ठेवा त्यांनी जतन करून ठेवला आहे.



त्यांना विकासाच्या प्रवाहात आणण्यासाठी आपण घरकुल पासून वीजेच्या सेवासुविधा पर्यंत, शिक्षणापासून स्वयंरोजगारापर्यंत विविध योजना पोहोचविल्या आहेत. यात कालपरत्वे भर घालून आता सौर ऊर्जासारख्या नव्या योजनांची जोड देत आहोत. भौतिक विकाससमवेत त्यांनी जपलेल्या सांस्कृतिक कला परंपरांना चालना देण्यासाठी पारशिवणी येथे आपण तीन दिवसीय 'कुंवारा भीमसेन आदिवासी लोककला सांस्कृतिक प्रदर्शनीचे आयोजन केले असल्याचे प्रतिपादन वित्त व नियोजन राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल यांनी केले.

पारशिवणी येथे आयोजित तीन दिवसीय 'कुंवारा भीमसेन आदिवासी लोककला सांस्कृतिक प्रदर्शनीचे' थाटात उद्घाटन समारंभात राज्यमंत्री ॲड. आशिष जयस्वाल बोलत होते. या महोत्सवाचे उद्घाटन त्यांनी उपस्थित आदिवासी आदिवासी बांधवांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून केले.

आज सादर करण्यात आलेल्या सांस्कृतिक कार्यक्रमात विविध पारंपरिक आदिवासी नृत्यप्रकारांनी प्रेक्षकांचे विशेष लक्ष वेधले. गेंडी नृत्य, खापरी नृत्य, बैगा कर्मा नृत्य तसेच सोंगी मुखवटे या कलाप्रकारांचे सादरीकरण आदिवासी कलाकारांनी केले. याचबरोबर विशेष आकर्षण होते ते इंडियन आयडल फेम प्रसिद्ध गायिका शन्मुखा प्रिया हिचे. तिने हिंदी चित्रपटातील गीते सादर करून श्रोत्यांना ठेका धरायला लावला.

# सणसरमध्ये शिवतेज शिवजयंती तिथीनुसार उत्सहात साजरी

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** इंदापूर तालुक्यातील सणसर गावात श्री छत्रपती शिवाजी महाराज यांची जयंती परंपरने चालत आलेल्या तिथीनुसार साजरी करण्यात येत असती. यावर्षी पण शिवजयंती तिथीप्रमाणे व पारंपरिक पद्धतीने साजरी करण्यात आली असून शिवजयंती उत्सव कमिटी अध्यक्ष राहुल जगताप उपाध्यक्ष कुलदीप निंबाळकर खजिनदार बाबाराजे रायते विक्रम भैय्या निंबाळकर यांनी दिली.

यावर्षी शुक्रवार दि.18 एप्रिल रोजी सकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे पूजन सरपंच यशवंत पाटील माजी सरपंच राहूल भैय्या काळे,पार्थ निंबाळकर,माजी उपसरपंच अभयराजे निंबाळकर,औदुंबर पाटील,शंभूराजे निंबाळकर,योगेश गोरे,विजय



शिरसट,अशोक जगताप गणेश भोसले पोलीस पाटील राजेंद्र चव्हाण राजाभाऊ निंबाळकर विक्रमसिंह निंबाळकर,सुमित पाटील,अक्षय निंबाळकर,हेमंत पाटील,राजाभाऊ जाधव यांच्या हस्ते करण्यात आले.यावेळी पुणे बार असोसिएशनच्या ऑडिटर पदी निवड झाल्याबद्दल शिवराज निंबाळकर व नूतन संचालक जगदीश कांबळे यांचा सत्कार करण्यात आला.दुपारच्या सत्रात छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पोवाड्याचा कार्यक्रम करण्यात येऊन संध्याकाळी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या मिरवणुक रथाचे पूजन संचालक शिवाजीराव निंबाळकर माजी संचालक संभाजीराव निंबाळकर विक्रम भैय्या निंबाळकर अजीजभाई तांबोळी यांच्या हस्ते पूजन करून पारंपरिक पद्धतीने लेझीम पथक ढोलताशा पथक, जुन्या काळातील मर्दानी खेळ दाखवून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याची मिरवणूक सणसर गावातून काढण्यात आली.या कार्यक्रम व्यवस्थित पार पाडण्यासाठी विक्रम भैय्या निंबाळकर,गणेश भोसले,निखिल भोसले व जयंती उत्सवाचे जेष्ठ सदस्य रमेश सोनार,अंबादास बनसोडे,अविनाश सूर्यवंशी,बबलू गोरे,प्रकाश जगताप,सुनिल तात्या निंबाळकर,विकास काळे,अतुल घोडे,विशाल रायते,विलास रायते,सागर चव्हाण,निलेश भाग्यवंत यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

# जेएनपीए टाऊनशिपमध्ये ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाचे उन्हाळी शिबिर संपन्न

## बी.के. उज्वला दीदींच्या मार्गदर्शनात मिळाली 'संस्कारांची शिदोरी!'

**दैनिक युवक आधार**

**तृप्ती भोईर उरण/ प्रतिनिधी :** मुलांच्या शारीरिक आणि मानसिक जडणघडणीसाठी तसेच त्यांना मोबाईलच्या व्यसनापासून दूर ठेवून सुसंस्कृत पिढी घडवण्यासाठी प्रजापिता ब्रह्मकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने जे एनपीए टाऊनशिपमध्ये १४ एप्रिल ते १७ एप्रिल या कालावधीत चार दिवसीय उन्हाळी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. बी.के. उज्वला दीदींच्या कुशल मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या शिबिरातून विद्यार्थ्यांना मोलाची 'संस्कारांची शिदोरी' मिळाली. विद्यार्थ्यांना जीवनात प्रत्येक क्षेत्रात अव्वल स्थान कसे प्राप्त करायचे आणि खऱ्या अर्थाने 'धुरंधर' कसे बनायचे, याचे मार्गदर्शन करण्यात आले. अभ्यासाचा ताण न घेता खेळत-हसत प्रगती कशी करावी, याचे तंत्र मुलांना शिकवण्यात आले. सकाळी ७:३० ते दुपारी १२:३० या वेळेत मुले प्रार्थना, योगसाधना आणि मेडिटेशनच्या माध्यमातून एकाग्रता वाढवण्याचे धडे देण्यात आले. शिबिरात मुलांच्या कलागुणांना



वाव देण्यासाठी चित्रकला, कार्यानुभव, स्मरणशक्ती स्पर्धा आणि विविध इनडोअर-आऊटडोअर खेळांचे आयोजन करण्यात आले होते. विशेष म्हणजे 'पाढे' एका खेळाच्या माध्यमातून कसे पाठ करावेत आणि व्यवहारातील चातुर्य व सहनशीलता कशी जोपासावी, यावर तज्ज्ञांनी मार्गदर्शन केले. 'स्वर्णीय भारताची ओळख' करून देताना भारतीय संस्कृतीचे महत्त्व हे मुलांना पटवून देण्यात आले. शिबिराच्या शेवटच्या दिवशी विद्यार्थ्यांनी नृत्य आणि गायनातून आपल्या कलेच्या सादरीकरण केले विविध स्पर्धांमधील विजेत्या विद्यार्थ्यांना मान्यवरांच्या हस्ते आकर्षक बक्षीस देऊन सन्मानित करण्यात आले बी के उज्वला दिदी आणि केंद्रातील सर्व सहकाऱ्यांनी घेतलेल्या परिश्रमामुळेच मुलांमध्ये एक नवा उत्साह पाहायला मिळाला. मुलांचे मानसिक संतुलन चांगले राहावे आणि त्यांच्यातील राग ग्रेट जाऊन सकारात्मकता वाढविण्यासाठी अशा शिबिराची गरज पालकांनी व्यक्त केली हे शिबिर केव्हा जे एन पि ए पुरते मर्यादित न राहता या उन्हाळी सुट्टीत उरण तालुक्यात विविध ठिकाणी राबवले जाणार असल्याची माहिती यावेळी देण्यात आली.

# आमठाणा येथे तरुणाला बेदम मारहाण ; चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/ सिल्लोड :-** तालुक्यातील आमठाणा येथे शुक्रवारी दुपारी जुन्या वादातून एकास चौघांनी मिळून बेदम मारहाण केल्याची घटना घडली. या प्रकरणी शनिवारी (दि. १८) सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सिल्लोड-घाटनांद्रा रस्त्यावरील आमठाणा गावाजवळ असलेल्या 'आमदार बिअर बार' समोर शुक्रवारी दुपारी ही घटना घडली. यातील फिर्यादी प्रमोद तात्याराव ठोंबरे (वय २३, रा. तळणी, ता. सिल्लोड) हा ट्रक चालक असून, त्याने दिलेल्या फिर्यादीनुसार, आरोपी अजय



माणिक हाके (रा. सिरसाळा, ता. सिल्लोड) याने इतर तीन साथीदारांसह येऊन त्याला गाठले.

फिर्यादीने ज्या मुलीसोबत लग्न केले आहे, त्या मुलीशी लग्न करण्याची इच्छा आरोपी अजय हाके यास होती. याच रागातून आरोपी अजय व त्याच्या इतर तीन साथीदारांनी फिर्यादीस शिवीगाळ करत, "आज तुझा गेमच करतो, तुला मारून टाकल्यावरच माझे तिच्यासोबत लग्न होईल," अशी धमकी दिली. त्यानंतर आरोपींनी फिर्यादीच्या पाठीत हॉकी स्टिक व शॉकअप रॉडने मारहाण केली. तसेच, आरोपीच्या हातातील हॉकी स्टिक फिर्यादीच्या डोक्यात मारून व उजव्या पायाच्या पोटरीच्या हाडावर वार करून गंभीर दुखापत केली.

अशा आशयाच्या फिर्यादीवरून अजय हाके व इतर तीन अज्ञात आरोपींविरुद्ध सिल्लोड ग्रामीण पोलीस ठाण्यात शनिवारी (दि. १८) गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक लहू घोडे हे करत आहेत.

# डिलिमिटेशनमुळे महिला आरक्षणाची अंमलबजावणी लांबणीवर — सभापती नं पं ज्योत्सना धवसे

**दैनिक युवक आधार**

**नांदगाव खंडेश्वर (प्रतिनिधी): प्रदिप रघुते** : केंद्र सरकारने मोठ्या गाजावाजात मंजूर केलेल्या "नारी शक्ती वंदन अधिनियम" या महिला आरक्षण कायद्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी लांबणीवर टाकण्यात आल्याचा आरोप नगरपंचायत नांदगाव खंडेश्वरच्या आरोग्य व स्वच्छता सभापती तथा गटनेत्या सौ. ज्योत्सना अमोल धवसे यांनी केला आहे.

प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात त्यांनी नमूद केले की, सप्टेंबर २०२३ मध्ये संसदेत मंजूर झालेल्या या कायद्यानुसार लोकसभा व राज्यांच्या विधानसभांमध्ये महिलांसाठी ३३ टक्के आरक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. मात्र, या आरक्षणाची अंमलबजावणी



नवीन जनगणना व मतदारसंघ पुनर्रचना (डिलिमिटेशन) यांच्याशी जोडल्याने ती प्रत्यक्षात पुढे ढकलली गेली आहे.

सौ.ज्योत्सना धवसे यांनी म्हटले की, "प्रक्रियात्मक अटींचा आधार घेत सरकारने महिला आरक्षणाची अंमलबजावणी अनिश्चित काळासाठी लांबणीवर टाकली आहे. महिलांना तात्काळ प्रतिनिधित्व देण्याऐवजी विलंब केला जात आहे, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे."तसेच, अलीकडे सादर करण्यात आलेले विधेयक हे महिला आरक्षणाशी संबंधित नसून केवळ मतदारसंघ पुनर्रचनेशी संबंधित असल्याचे त्यांनी स्पष्ले. "महिला सक्षमीकरणाच्या नावाखाली केवळ घोषणा केल्या जात असून प्रत्यक्षात कृतीचा अभाव दिसतो," अशी टीकाही त्यांनी केली.

काँग्रेस पक्षाची भूमिका स्पष्ट असून, २०२३ मध्ये मंजूर झालेल्या महिला आरक्षण कायद्याची अंमलबजावणी कोणतीही अट न घालता तात्काळ करण्यात यावी,

अशी मागणी त्यांनी केली.

"महिलांना त्यांच्या हक्काचे प्रतिनिधित्व त्वरित मिळणे ही काळाची गरज असून त्यासाठी होणारा विलंब अन्यायकारक आहे," असेही त्यांनी नमूद केले.

# "वासनी मध्यम प्रकल्पाचा जल्लोषात लोकार्पण सोहळा; सिंचनक्रांतीकडे ऐतिहासिक पाऊल"

**दैनिक युवक आधार**

**ज्ञानेश्वर काळे | तालुका प्रतिनिधी, दर्यापूर :** अनेक वर्षांपासून प्रतीक्षेत असलेल्या वासनी मध्यम प्रकल्पाचे आज उत्साहपूर्ण वातावरणात लोकार्पण पार पडले. या प्रकल्पामुळे अचलपूर व दर्यापूर तालुक्यातील हजारो हेक्टर शेतीला सिंचनाचा लाभ मिळणार असून, शेतकऱ्यांच्या आशा नव्याने पल्लवित झाल्या आहेत.

महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाच्या माध्यमातून, विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मुख्य अभियंता (अमरावती) आणि उर्ध्व वर्धा सिंचन मंडळ यांच्या समन्वयातून हा महत्त्वपूर्ण प्रकल्प साकारण्यात आला आहे.

आमदारांच्या हस्ते जलपूजन व लोकार्पण

दर्यापूरचे आमदार गजाननभाऊ लवटे आणि अचलपूरचे आमदार प्रवीणजी तायडे यांच्या हस्ते फीत कापून व जलपूजन करून प्रकल्पाचे औपचारिक उद्घाटन करण्यात आले. यावेळी परिसरात जल्लोषाचे वातावरण पाहायला मिळाले.

"प्रलंबित स्वप्न पूर्णत्वास" – आमदार लवटे

मनोगत व्यक्त करताना आमदार गजाननभाऊ लवटे म्हणाले,

"हा प्रकल्प अनेक वर्षांपासून रखडलेला होता. विधानसभेत तसेच शासन दरबारी सातत्याने पाठपुरावा केल्यामुळे अखेर आज हा क्षण पाहायला मिळाला. पुढील कामे जलद आणि दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश देण्यात आले आहेत."






शेतीसाठी जीवनदायी प्रकल्प

वासनी मध्यम प्रकल्पामुळे परिसरातील सिंचन व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. खरीप आणि रब्बी हंगामातील उत्पादनात वाढ होऊन शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. तसेच, दीर्घकाळ भेडसावणाऱ्या पाणीटंचाईच्या समस्येवरही मोठा दिलासा मिळणार असल्याचा विश्वास शेतकऱ्यांनी व्यक्त केला.

मान्यवरांची मोठ्या संख्येने उपस्थिती

या सोहळ्यास शिवसेना उपनेते सुधीरभाऊ सूर्यवंशी, जिल्हाप्रमुख नरेंद्रभाऊ पडोळे, कार्यकारी अभियंता अश्विनी राऊत, उपजिल्हा प्रमुख मुन्नाभाऊ शर्मा, सरपंच मोहनभाऊ मुंदाने यांच्यासह विविध पदाधिकारी, जलसंपदा विभागाचे अधिकारी, कंत्राटदार कंपनीचे प्रतिनिधी व परिसरातील ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार प्रदर्शन संबंधित अधिकाऱ्यांनी केले.

निष्कर्ष:

वासनी मध्यम प्रकल्पाचे लोकार्पण हे केवळ उद्घाटन नसून, विदर्भातील शेतकऱ्यांसाठी नव्या आशा, पाण्याची शाश्वतता आणि विकासाचा नवा अध्याय ठरणार आहे.

# सणसर भवानीनगरात गॅसचा काळाबाजार रोखण्यात प्रशासन अपयशी ?

**दैनिक युवक आधार**

**सणसर : विकास क्षत्रिय :** देशातील युद्धजन्य परिस्थितीमुळे परगुती गॅसचा तुटवडा निर्माण झाला असून सणसर भवानीनगर भागातील नागरिकांना गेल्या महिन्याभरापासून गॅस मिळत नसल्याचे चित्र दिसत आहे. मात्र,हॉटेल व्यवसायिकांना मात्र रात्रीच्या वेळी गॅस सहज उपलब्ध होत असल्याचे नागरिकांनी निदर्शनास आणून दिले आहे.इंदापूर तालुका



पुरवठा विभागाने गॅसचा काळाबाजार करणाऱ्यांना गय केली जाणार नाही असा कडक इशारा दिला होता. तथापि,या इशाऱ्याचा गॅस एजन्सींवर कोणताही परिणाम झालेला नाही.नागरिकांना गॅस मिळत नसताना हॉटेल व्यवसायिकांकडे गॅसचा साठा सहज उपलब्ध होत असल्याने प्रशासनाच्या कारवाईवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. घरगुती गॅस हा नागरिकांच्या दैनंदिन जीवनासाठी अत्यावश्यक आहे.मात्र हॉटेल व्यवसायिकांनी अवैध पद्धतीने गॅसचा साठा करून ठेवला असल्यामुळे सामान्य ग्राहकांना मोठा फटका बसत आहे.यामुळे घरगुती ग्राहकांना स्वयंपाकासाठी गॅस मिळवणे कठीण झाले आहे. या गंभीर परिस्थितीवर इंदापूर तालुका पुरवठा विभागाने तातडीने कारवाई करावी,अशी मागणी नागरिकांनी केली आहे. सर्वसामान्य ग्राहकांना न्याय मिळावा आणि गॅसचा काळाबाजार थांबवावा,अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.गॅसचा तुटवडा आणि काळाबाजारामुळे नागरिकांचे जीवन विस्कळीत झाले आहे. प्रशासनाने तातडीने ठोस पावले उचलून गॅसचा पुरवठा सुरळीत करावा,अन्यथा नागरिकांचा रोष वाढण्याची शक्यता आहे.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# कर्तृत्ववाने महान असलेले श्री.कांशीराम किसन तायडे रिटायर्ड RPf हवालदार चांदुरबिस्वा

**दैनिक युवक आधार**

स्मशान भूमीत भुत पिछात राहतात मेलेल्या माणसांची आत्मा तिथे वास करते ही बहुजन समाजात हजारो वर्षे पासुन खोटी अंधश्रद्धा पसरविण्यात आली.जगात सर्व प्रथम या खोटी मान्यतेच्या विरोधात तथागत बुद्ध यांनी आवाज उठवला त्यांच्या नंतर अनेक संत महापुरुष यांनी सांगितले.देव देवळात नसुन माणसात आहे राष्ट्रसंत गाडगे महाराज यांनी सांगितले आज त्या देव माणसाला भेटण्याची त्यांच्या सोबत संवाद साधण्याची संधी मिळाली.

काल जवळच्या नातेवाईक कालकथीत निलेश भगवान कठाडे यांचे अल्पसा आजाराने निधन झाले त्यांच्या अंतिम यात्रे मध्ये सहभागी होण्यासाठी सकाळी घरून निघालो सकाळ ची नऊ वेळ दिली असल्यामुळे मला वाटेतच उशीर झाला म्हणून मी सरळ स्मशान भूमीत गेलो मी माझी गाडी झाडाच्या सावलीत उभी करीत असतानाच अश्शी पंच्याशी वर्षं चे बाबा हसत व प्रशनन मुद्रेने हातात पाण्याची बाटली घेऊन आले आणी मला म्हणाले या साहेब, घ्या पाणी मी त्यांना जयभीम घातला त्यांनी सुध्दा मला मोठ्या आदराने जयभीम घातला आणी स्मशान भूमीत ठेवले बाकावर बसण्यास विनवी केली ज्या बेंच वर आम्ही बसणार होतो तेवढ्यात बाबा म्हणाले साहेब थोडं थांबा बेंच वर धुळे बसली आहे. ते साफ करतो त्यांनी लगेच आपल्या गळयातील रूमाल काढुन बेंच साफ केला आणि ते म्हणाले साहेब आता बसा आम्ही दोघे ही बेंच वर बसलो मी विचार करू लागलो की यांना मी कधीही पाहिले नाही. यांची व माझी ही पहिलीच भेट आहे. येवढे आदर तिथं जे एक नातेवाईक दुसऱ्या नातेवाईक यांना देत नाही. हा विचार मनात करीत असतांनाच त्यांनी मला विचारना केली साहेब आपण कुठुन आला, मी त्यांना माझ्या परिचय दिला. नंतर मला असे वाटले हे सुध्दा ज्या मयत साठी मी आलो आहे. त्यासाठी हे सुध्दा आले असतील मी त्यांना विचारणा केली आपण कुठुन आलात त्यावर कांशीराम तायडे साहेब यांनी सांगितले साहेब मी इथालच आहे.मी रिटायर्ड झाल्या नंतर गांवावर आलो आहे. मी त्यांना म्हटले सर्विस झाल्यावर इतर रिटायर्ड लोक आपल्या मुलांच्या भविष्यासाठी शहराकडे जातात तुम्ही गांव निवडले?. त्यावर कांशीराम तायडे म्हणाले सरकारी नोकरी करीत असताना मी संपूर्ण




देश फिरलो देश सेवा केली आता गांवाची सेवा करायची आहे!.

मी शुन्य नजरेने बघत होतो ते पुढे म्हणाले साहेब माझी पत्नी जिवंत असताना मला सांगत होती की आपल्या गावातील स्मशान भूमीत महादेवाची प्रतिमा बसवा मी ठिक आहे म्हणून वेळ मारून नेत होतो त्यांच्या अवघ्या दिड महिन्यात तीचा मृत्यू झाला तिची हयातीत अपुर्व राहीलेली इच्छा पुर्ण करण्यासाठी मी ही शंकर महादेव यांची प्रतिमा लावलेली आहे. तेव्हा पासून मी स्मशान भूमीत बेंच,झाडे,फुलबाग,रस्त्याच्या दोन्ही बाजूला निमसरय विविध प्रकारच्या फुल झाडे लावुन त्यांना सकाळ संध्याकाळ पाणी घालण्याचे काम मी व माझ्या दोघे सहकारी करीत असतो.गांवात कुठल्याही जाती पंथाच्या लोकांना स्मशान भूमीत आल्यानंतर गैरसोय होवु नये म्हणुन सर्व साहित्य उपलब्ध करून देतो. माझे वडील किसन तायडे यांच्या स्मरणार्थ प्रेतला विसावा घेण्यासाठी चबुतरा बनविला आहे तेथे नेवुन दाखविले संपूर्ण फुलांनी बहरलेली स्मशान भूमी तायडे साहेब मला दाखवत होते. मी ते पाहत असताना अशा भास होत होता की मी कुठल्या तरी बगीच्यात फिरायला आलो आहे.

स्मशान भूमीतील रास्त्याच्या झाडाच्या खोडाशी पक्षी यांना पाणी ठेवले होते. सर्व झाडावर असंख्य पक्षी गोजारवण किलबिलाट करत होते, तर इतर पक्षी तायडे साहेब यांनी टाकलेले अन्न टिपुन खात होते. मी त्यांना म्हटले तायडे साहेब तुम्ही स्मशान भूमी बद्दल ची भिती जी सर्व जनमाणसामध्ये आहे जी इथल्या व्यवस्थेने निर्माण केलेली ती भीतीच नाहीसी करत आहेत. त्यावरून त्यांनी सांगितले अगोदर लोक एकडे येण्यास घाबरत होते आता मात्र शांती मिळावी म्हणून येत आहेत. दर बुधवारी रात्री स्मशान भुमी मध्ये आम्ही दहा पंधरा लोक मिरची भांजी ठेवुन समुहाने भोजन घेत आहोत. हा कार्यक्रम रात्री 11 वाजे पर्यंत चालतो. आम्ही गावातील अनेक लोकांना जेवणासाठी आमंत्रित करतो आहे परंतु बरीच लोक भीती पोटी जेवणाला येत नाही.

मी त्यांचे बोलणे ऐकत होतो स्मशान भूमीच्या विविध फुलांच्या माळा झाडे यांनी वेढलेला तो परीसर शहरातील किंवा पर्यटन स्थळा पेक्षा स्वच्छ व सुंदर होता. ज्या कांशीराम तायडे यांनी सरकारी नोकरीतुन देश सेवा केली रिटायर्ड झाल्या नंतर आपल्या मुलांच्या भविष्यासाठी शहराकडे न जाता गांवाकडे येवुन स्मशान भूमी ला सुशोभित करून मानव सेवेचे व्रत धारण केले, एकदाच चांदुर बिस्वा येथील स्मशानभूमी ला भेट देऊन मन प्रसन्न झाले. प्रत्येक गावात असे कांशीराम तायडे असले पाहिजेत त्यांना मी भिम सैनिक संजय इंगळे बेलाड कडुन त्यांच्या कार्यास मानाचा क्रांतीकारी जयभीम करतो.

**भवतु सब्ब् मंगलम्**

# मंगरूळ फाट्यावर निसर्गावर 'कुऱ्हाड'; जैवविविधतेचा मानबिंदू 'बूच पांगारा' तोडला

## २८ प्रजातींच्या पक्षांचा हक्काचा 'नॅचरल ज्यूस बार' उद्धवस्त

**दैनिक युवक आधार**

**योगेश पालोदकर/सिल्लोड** :-मंगरूळ फाटा येथील सलेमिया मदरशाच्या आवारात पर्यटकांना मोहून टाकणारा आणि पक्ष्यांचा 'नॅचरल ज्यूस बार' म्हणून ओळखला जाणारा बहरलेला 'बूच पांगारा' काही अज्ञातांनी कुऱ्हाडीने तोडून नष्ट केला आहे. जैवविविधतेच्या दृष्टीने 'की-स्टोन' (Keystone) मानल्या जाणाऱ्या या वृक्षाची कत्तल केल्याने परिसरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

गत आठवड्यात हा वृक्ष फुलांनी पूर्णपणे बहरला होता. या निसर्गसौंदर्याने अनेक नागरिकांना भुरळ घातली होती. मात्र, काल दुपारी काही तरुणांनी कोणत्याही सबळ कारणाशिवाय या वृक्षावर कुऱ्हाड चालवली. स्थानिक नागरिकांनी हे झाड बांधावर असल्याने



कोणालाही अडचण नाही, उलट ते निसर्गसौंदर्य वाढवते, अशी विनंती केली होती; तरीही ती धुडकावून झाड तोडण्यात आले.

ही घटना कळताच पर्यावरण अभ्यासक डॉ. संतोष पाटील यांनी घटनास्थळी धाव घेतली. झाड वाचवता आले नाही, तरी त्याचे अस्तित्व टिकवण्यासाठी त्यांनी फांद्या (स्टंप कटिंग) तात्काळ गोळा केल्या. या फांद्या अन्वी (ता. सिल्लोड) येथील चापे कुटुंबीयांच्या शेतात शास्त्रीय पद्धतीने पुनर्रोपित केल्या आहेत. एका झाडाच्या बदल्यात आता दहा नवी झाडे जगवण्याचा निर्धार डॉ. पाटील यांनी व्यक्त केला आहे.

हे झाड केवळ शोभेचे नव्हते, तर ते एका समृद्ध परिसंस्थेचा आधार होते. याच्या फुलांतील मकरंद आणि परागकण अनेक पक्षी आणि कीटकांचे अन्न होते. विशेषतः 'जांभळा शिंजीर' या पक्ष्यांचा हा अधिवास होता. हा वृक्ष तोडल्याने या पक्ष्यांचे हक्काचे घर हिरावले गेले आहे.

या प्रकाराची माहिती वन विभागाला देण्यात आली आहे. वृक्षारोपणाच्या सरकारी योजना कागदावर असताना, उभे बहरलेले वृक्ष वाचवण्यात आपण अपयशी ठरत आहोत का, हा प्रश्न या घटनेने ऐरणीवर आला आहे. दोषींवर तातडीने कायदेशीर कारवाई व्हावी, हीच निसर्गप्रेमींची आता एकमुखी मागणी आहे.

**निसर्ग-हत्तेचा निषेध:**

**जैवविविधतेचा ऱ्हास: २८ प्रजातींच्या पक्ष्यांचा 'नॅचरल ज्यूस बार' कायमचा बंद.**

**प्रशासनाला इशारा: वृक्षारोपणाच्या योजना असताना, अस्तित्वातील वृक्ष वाचवण्यात आपण अपयशी का?**

**सामूहिक जबाबदारी: दोषींवर कठोर कायदेशीर कारवाईची आता वेळ आली आहे.**

**पर्यावरण संवर्धन ही चैनीची गोष्ट नसून, अस्तित्वाची लढाई आहे!**

# सामाजिक समता सप्ताह



**डॉ सुनिल भगत प्रतिनिधी**
**दैनिक युवक आधार**

महामानव महात्मा जोतिबा फुले व महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंती निमित्य महा.अनिस दरवर्षी सामाजिक समता सप्ताह साजरा करीत असते.

त्या अंतर्गत दिनांक १८ एप्रिल २०२६ रोजी डॉ बाबासाहेब आंबेडकर सामाजिक भवन ,टाकळी सीम आवळे नगर हिंगणा रोड नागपूर येथे महा.अनिस च्या सांस्कृतिक विभागा तर्फे मी रमाई बोलते हे एकपात्री नाटक सादर केले गेले.

शोभा गौतम पाटील, रमाईच्या भूमिकेत तर इंजि. गौतम पाटील सर डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या भूमिकेत होते.

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची भूमिका रामभाऊ डोंगरे राज्य कार्यकारिणी सदस्य यांनी मांडली व चमत्कार करून दाखविले.

डॉ.सुनील भगत जिल्हा प्रधान सचिव यांनी सुद्धा विविध उपक्रमाची माहिती दिली.

या वेळी देवयानी भगत राज्य सहकार्यवाह महिला विभाग, विजयाताई श्रीखंडे राज्य सहकार्यवाह मानस मित्र विभाग, सुमेध शेवडे,वसंत मोहिले,सुषमा शेवडे, विजयाताई ठाकरे,माही मोहिले,उमेश चित्ते व परिसरातील मोठ्ठा जनसमुदाय प्रामुख्याने उपस्थित होता.

# मारहाण करून झाडाला बांधले

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : मारहाण करून झाडाला बांधल्या प्रकरणी चौघां विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात 17 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.सत्यजित कोळी हे गव्हाण येथे राहत असून त्यांचा मित्र पुरुषोत्तम म्हात्रे(बामणडोंगरी) हे तळोजा मजकूर येथे राजे यांची जमीन विक्री अनुषंगाने पाहण्यासाठी तलावाजवळ गेले. तलावा जवळचे फोटो काढत असताना ते चुकून शेजारच्या जमिनीच्या जागेमध्ये गेले. यावेळी शेतीचे काम करत असलेला विनायक पाटील यांनी जवळ येऊन तुम्ही शेताचे फोटो का काढता ही जागा माझी आहे ते फोटो डिलीट करा असे सांगून शिवीगाळ केली. त्यानंतर संतोष पाटील, राहुल पाटील आणि अनोळखी ईसम यांना फोन करून बोलावले आणि लाकडी बांबूने सत्यजित आणि पुरुषोत्तम यांना मारहाण करत शिवीगाळ केली. त्यानंतर दोघांना खेचत घराकडे नेले आणि घराबाहेर असलेल्या झाडाला सत्यजित कोळी यांना बांधून ठेवले.

# ट्रकची दुचाकीला धडक, तरुण जखमी

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : भरधाव वेगाने आलेल्या ट्रकने दुचाकीला धडक दिली. या धडकेत 32 वर्षीय अक्षय खानावकर (राहणार नावडे) हा जखमी झाला. 17 एप्रिल रोजी ट्रक चालका विरोधात तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. अक्षय खानावकर हा त्याची दुचाकी घेऊन मुंब्रा पनवेल हायवे नावडे ब्रिज जात होता. यावेळी ट्रक क्रमांक आर जे 11 जीडी 3709 वरील चालकाने भरधाव वेगाने ट्रक चालवला आणि दुचाकीला धडक दिली. या धडकेत अक्षय याच्या उजव्या पायाचे हाड फ्रॅक्चर झाले.

# गेम खेळताना रागावल्याने सोडले घर

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल प्रतिनिधी** : गेम खेळणाऱ्या पंधरा वर्षीय मुलावर आई रागावल्याने त्याने घर सोडल्याची घटना सुकापुर येथे घडली. या प्रकरणी अनोळखी ईसमाविरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात 17 एप्रिल रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. संतोष कुमार मोरया हे सावन नगरी, सुकापुर येथे राहत असून त्यांचा पंधरा वर्षीय मुलगा मोबाईलवर सारखा गेम खेळतो. त्याची आई त्याच्यावर रागावली असता त्याने घरातून काहीही न सांगता तो निघून गेला. अनोळखी ईसमाने त्याला पळवून नेल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला.

# नाशिक शहरात रंगणार जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धा

## 150 हून अधिक खेळाडूंचा सहभाग

**दैनिक युवक आधार**

**निफाड क्रीडा प्रतिनिधी विलास गायकवाड :** क्रीडाप्रेमींसाठी आनंदाची बातमी! नाशिक शहरात येत्या 26 एप्रिल 2026 रोजी जिल्हास्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेचा थरार अनुभवायला मिळणार आहे. स्पोर्ट्स किकबॉक्सिंग असोसिएशन, नाशिक डिस्ट्रिक्ट यांच्या संयुक्त विद्यमाने या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.विभागीय क्रीडा संकुल, नाशिक येथे होणाऱ्या या स्पर्धेत सब-ज्युनिअर, ज्युनिअर, कॅडेट, युथ आणि सिनिअर या विविध वयोगटांमध्ये सामने रंगणार आहेत. नाशिक जिल्ह्यातील विविध शाळा, महाविद्यालये आणि तालुक्यांमधून तब्बल 150 हून अधिक खेळाडू आपले कौशल्य दाखवणार असून, सुमारे 25 पंच व प्रशिक्षक स्पर्धेचे नियोजन व संचालन पाहणार आहेत.

स्पर्धेचे उद्घाटन रविवार, 26 एप्रिल रोजी सकाळी 10 वाजता होणार असून, यावेळी असोसिएशनचे अध्यक्ष संकेत चंद्रमोरे यांच्या उपस्थितीत स्पर्धेला सुरुवात होणार आहे. त्यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यात किकबॉक्सिंग खेळाला नवे बळ मिळत असल्याचे चित्र दिसत आहे.

या स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पुढील पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय किकबॉक्सिंग स्पर्धेसाठी निवड केली जाणार आहे, त्यामुळे खेळाडूंसाठी ही मोठी संधी ठरणार आहे.

नाशिक शहरात रंगणाऱ्या या स्पर्धेमुळे क्रीडाक्षेत्रात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून, प्रेक्षकांना दमदार आणि रोमांचक सामने पाहण्याची संधी मिळणार आहे. अधिक माहितीसाठी संपर्क:संकेत चंद्रमोरे – 8888298708

# बुरूड समाजातर्फे नांदेड येथे सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन

**दैनिक युवक आधार**

**नांदेड : प्रतिनिधी अरविंद पांचाळ** : नांदेड जिल्हा बुरूड समाज संघटना ही महाराष्ट्रातील उपक्रमशील संघटना म्हणून ओळखली जाते. संघटनेतर्फे नेहमीच विविध धार्मिक, सामाजिक व लोकहिताचे उपक्रम राबविण्यात येतात. त्याचाच एक भाग म्हणून यावर्षी दि. २१ एप्रिल २०२६ रोजी नांदेड येथे भव्य सामूहिक विवाह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

या सोहळ्याचे अध्यक्षस्थान माननीय श्री मोहनरावजी पाटकुटवार भूषविणार असून, या विवाह मेळाव्यात सुमारे दहा जोडपी विवाहबद्ध होणार आहेत. या कार्यक्रमाचा सर्व खर्च महाराष्ट्रातील दानशूर व्यक्तींच्या सहकार्याने उचलण्यात येणार आहे.या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून हरीजी पिंपळे साहेब, किशोर भाऊ जोरगेवार, शिवसेना उपनेते चंद्रकांत खैरे साहेब, हेमंत भाऊ पाटील, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार आनंदरावजी बोंढारकर, नगराध्यक्ष अर्चनाताई वासमवार तसेच महाराष्ट्रातील विविध नगरसेवक व पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत.

या सामूहिक विवाह सोहळयास जास्तीत जास्त समाजबांधवांनी उपस्थित राहावे, असे आवाहन संघटनेचे उपाध्यक्ष साईनाथ गुडमलवार, सरचिटणीस संजय हळदे, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रवी मांजरे, युवा अध्यक्ष साईदास नागेश्वर, महिला अध्यक्ष मनीषाताई नागेश्वर, महानगराध्यक्ष मंगलाताई गुडमलवार, तसेच मंदिर समितीचे गंगाधर रायरकर, मनीष जोरगेवार, अमित पाटकुटवार, कैलास सुनेवाड, स्वप्निल गुडमलवार, बालाजी देवके, किरण नागेश्वर, शिवाजी नागेश्वर, सचिन नागेश्वर, राजू गुडमलवार, बालाजी पेंढारकर व सर्व कार्यकारिणी सदस्यांनी केले आहे.

# मुलींनो, तुम्ही रणरागिणी आहात... स्वत:ला ओळखा आणि समृद्धीचे जीवन जगा!" — रोशन खोब्रागडे (सामाजिक कार्यकर्ता)

**दैनिक युवक आधार**

**रोशन खोब्रागडे लाखनी तालुका प्रतिनिधी** : आजच्या आधुनिक युगात स्त्री ही केवळ घरापुरती मर्यादित राहिलेली नाही, तर ती प्रत्येक क्षेत्रात आपली ताकद सिद्ध करत आहे. तरीही अनेक मुली अजूनही स्वतःच्या क्षमतेबद्दल अनभिज्ञ आहेत. अशा वेळी रोशन खोब्रागडे यांचा संदेश प्रत्येक मुलीसाठी प्रेरणादायी ठरतो. "तुम्ही रणरागिणी आहात, स्वतःला ओळखा!" रणरागिणी म्हणजे केवळ तलवार हातात घेऊन लढणारी स्त्री नव्हे, तर संकटांशी धैर्याने सामना करणारी, आपल्या हक्कांसाठी उभी राहणारी आणि स्वतःचे अस्तित्व सिद्ध करणारी प्रत्येक मुलगी हीच खरी रणरागिणी आहे. समाजाने घालून दिलेल्या चौकटी तोडून स्वतःचा मार्ग तयार करणे, हेच खरे धैर्य आहे.आज अनेक मुली शिक्षण, व्यवसाय, प्रशासन, विज्ञान, क्रीडा अशा विविध क्षेत्रात आघाडीवर आहेत. पण अजूनही काही ठिकाणी भीती, संकोच आणि अवलंबित्वामुळे त्या मागे पडतात. रोशन खोब्रागडे यांचा संदेश स्पष्ट आहे — "स्वतःवर विश्वास ठेवा, कारण तुमच्यात अमर्याद शक्ती आहे."आत्मनिर्भरता हीच खरी समृद्धीची गुरुकिल्ली आहे. आर्थिकदृष्ट्या सक्षम होणे, स्वतःचे निर्णय स्वतः घेणे आणि स्वतःच्या स्वप्नांसाठी लढणे हे प्रत्येक मुलीने शिकले पाहिजे. शिक्षण हे त्यासाठी सर्वात प्रभावी साधन आहे. ज्ञान मिळवून, कौशल्य विकसित करून आणि आत्मविश्वास वाढवून मुली स्वतःचे आणि समाजाचे भविष्य घडवू शकतात. समाजात बदल घडवण्यासाठी मुलींनी स्वतःला कमी लेखणे थांबवले पाहिजे. "मी करू शकत नाही" या विचाराला "मी नक्की करू शकते" मध्ये बदलणे हीच खरी क्रांती आहे. प्रत्येक मुलीने आपल्या हक्कांची जाणीव ठेवून अन्यायाविरुद्ध आवाज उठवणे गरजेचे आहे. आजची गरज आहे ती जागरूक,



शिक्षित आणि आत्मनिर्भर स्त्रीची. जी स्वतःसाठी उभी राहील, आपल्या कुटुंबाला सक्षम करेल आणि समाजाला नवी दिशा देईल. रोशन खोब्रागडे यांचा संदेश केवळ शब्द नाही, तर प्रत्येक मुलीच्या आयुष्याला दिशा देणारा विचार आहे. मुलींनो, स्वतःची किंमत ओळखा...तुमच्यातील रणरागिणी जागी करा आणि आत्मनिर्भर बनून समृद्धीचे जीवन जगा!

# मंथन राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत गंगादेवी प्राथमिक शाळेचे घवघवी यश

**दैनिक युवक आधार**

**आष्टी प्रतिनिधी/बाळासाहेब रकटाटे :** गंगादेवी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांनी मंथन राज्यस्तरीय शिष्यवृत्ती परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करून शाळेचा नावलौकिक उंचावला आहे. विद्यार्थ्यांच्या परिश्रमासोबत शिक्षकांचे मार्गदर्शन आणि पालकांचे सहकार्य यामुळे हे यश शक्य झाले आहे.

यामध्ये शिक्षक शेख नईम सर यांचे चिरंजीव व इयत्ता तिसरीतील विद्यार्थी मो. उमर नईम शेख याने 300 पैकी तब्बल 250 गुण मिळवत केंद्रात प्रथम, विभागात 20वा आणि राज्यात 25वा क्रमांक मिळवून उल्लेखनीय कामगिरी केली आहे. त्याच्या या यशामुळे संपूर्ण शाळेत आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापक वामन सर नइम शेख यांच्या वतीने विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी शाळेतील शिक्षकवृंद, विद्यार्थी व पालक उपस्थित होते.तसेच कु. साक्षी शिरसाठ, चि. सार्थक शिरसाठ व चाँद शेख यांनीही परीक्षेत उत्तम यश संपादन करून शाळेचा गौरव वाढवला आहे. त्यांच्या यशाबद्दलही शाळेच्या वतीने अभिनंदन करण्यात येऊन पुढील शैक्षणिक वाटचालीस



हार्दिक शुभेच्छा देण्यात आल्या.या यशामुळे शाळेत स्पर्धा परीक्षांविषयी उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून इतर विद्यार्थ्यांनाही प्रेरणा मिळत आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांमध्ये असलेली जिद्द, चिकाटी आणि गुणवत्ता या यशातून अधोरेखित झाली आहे.सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन व उज्ज्वल भविष्यासाठी शुभेच्छा! विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणारे मुख्याध्यापक वामन सर व नईम शेख सर यांचेही सर्वत्र अभिनंदन होत आहे

# जिल्हाधिकाऱ्यांचे आदेश धाब्यावर !

## जिल्हा दुष्काळाच्या उंबरठ्यावर तरी ही तलावातून अवैध पाणी उपसा सुरूच ; पाणीटंचाईचे संकट गडद :- डॉ .गणेश ढवळे

**दैनिक युवक आधार**

**पाटोदा (प्रतिनिधी):** - पाटोदा तालुक्यातील भायाळा साठवण तलावातून सुरू असलेल्या अवैध पाणी उपश्यामुळे गंभीर परिस्थिती निर्माण झाली असून, जिल्हाधिकाऱ्यांच्या स्पष्ट आदेशानंतर ही संबंधित यंत्रणा निष्क्रिय असल्याचे समोर आले आहे. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी पिण्याच्या पाण्याचे नियोजन कोलमडू नये या साठी जिल्ह्यातील लघु व मध्यम प्रकल्पांमधून होणारा नियमबाह्य पाणी उपसा तत्काळ थांबवण्याचे आदेश महसूल व पाटबंधारे विभागाला दिले होते. मात्र या आदेशांची अंमलबजावणी होत नसल्याने प्रशासनाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. दरम्यान, भायाळा तलावावर अवलंबून असलेल्या भायाळा, वाघिरा, मेंगडेवाडी, लिंबागणेश, पोखरी (घाट),



पिंपरनई, बेलगाव (सोमनाथवाडी) आदी गावांमध्ये पाणी टंचाईचे सावट गडद होत चालले आहे. शेतातील विहिरी, सार्वजनिक पाणी पुरवठा योजना आणि विंधन विहिरी कोरड्या पडण्याच्या मार्गावर आहेत. अवैध पाणी उपसा रोखण्यासाठी नेमण्यात आलेले पथक निष्क्रिय असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते डॉ.गणेश ढवळे (लिंबागणेशकर) यांनी केला आहे. प्रशासन केवळ कागदोपत्री कारवाई करत असून प्रत्यक्षात कोणती ही ठोस उपाय योजना होत नसल्याची टीका त्यांनी केली आहे. शासनाच्या

**जिल्ह्यात पाणीसाठा झपाट्याने घटतोय, दुष्काळाची शक्यता वाढली...**

**वाढत्या तापमानामुळे बाष्पीभवनाचा वेग वाढला असून जिल्ह्यातील पाणीसाठा झपाट्याने कमी होत आहे. जिल्ह्यातील १६ मध्यम प्रकल्पांपैकी ३ प्रकल्पांमध्ये २५ टक्क्यांपेक्षा कमी पाणी शिल्लक आहे. तसेच १२६ लघु प्रकल्पांपैकी १२ प्रकल्प जोत्याखाली गेले असून २१ प्रकल्पांमध्ये ५० टक्केच पाणी आहे. शासनाच्या अहवालानुसार, जिल्ह्यातील १४३ धरणांमध्ये सध्या १९८.७१२ दशलक्ष घनमीटर पाणी मृतसाठ्यात आहे, तर ३० धरणांमध्ये १० टक्क्यांपेक्षा कमी पाणीसाठा शिल्लक आहे. बीड जिल्हा दुष्काळग्रस्त म्हणून ओळखला जातो. या वर्षी "अल निनो" च्या प्रभावामुळे परिस्थिती अधिक गंभीर होण्याची चिन्हे आहेत. त्या मुळे तातडीने उपाय योजना न केल्यास ग्रामीण भागात तीव्र पाणी टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही.**

**डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर)**
**सामाजिक कार्यकर्ते**

नियमानुसार तलावातील ६७ टक्के पाणीच सिंचनासाठी वापरण्याची परवानगी असून उर्वरित ३३ टक्के पाणी मानव, जनावरे व वन्यजीवांसाठी राखीव ठेवणे बंधनकारक आहे. मात्र या नियमांचे उल्लंघन होत असल्याने भविष्यात गंभीर पाणीबाणी निर्माण होण्याची भीती व्यक्त होत आहे. डॉ.गणेश ढवळे यांनी तलावातील पाणीसाठा संरक्षित ठेवावा तसेच कामचुकार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जिल्हाधिकाऱ्यांकडे केली आहे.

# टाकळखोपा–किर्ला वाळू घाटांवर पोकलेनने उत्खनन; "नेमकं कुणाच्या आशीर्वादाने?" — मनसेचा सवाल

**दैनिक युवक आधार**

**अमोल जोशी मंठा तालुका ग्रामीण प्रतिनिधी :** पूर्णा नदीपात्रातील टाकळखोपा व सासखेडा परिसरात दिवसाढवळ्या सुरू असलेल्या अवैध वाळू उपसा व विक्रीमुळे प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. टाकळखोपा–किर्ला घाटांवर पाण्यातून थेट पोकलेन मशीनद्वारे वाळू उपसा करून हायवा व टिप्परमध्ये भरली जात असल्याचे प्रकार उघडकीस आल्याने "हे उत्खनन नेमकं कुणाच्या आशीर्वादाने सुरू आहे?" असा सवाल मनसेचे जिल्हाध्यक्ष प्रकाश सोळंके यांनी जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांना दिलेल्या निवेदनातून उपस्थित केला आहे.

स्थानिक ग्रामस्थांच्या म्हणण्यानुसार, टाकळखोपा व सासखेडा हद्दीत ट्रॅक्टरच्या सहाय्याने किन्हीमार्गे वाळू उपसा करून अवैध विक्री केली जात आहे. यासंदर्भातील तक्रारी वाढत असतानाही संबंधित यंत्रणांकडून ठोस कारवाई होत नसल्याचा आरोप करण्यात येत आहे.

दरम्यान, टाकळखोपा–किर्ला वाळू घाटासाठी ९,१८७ ब्रास उत्खननाची परवानगी देऊन १७ मार्च रोजी में. शिव कन्स्ट्रक्शन (रा. मंठा) यांना घाटाचा ताबा देण्यात आला आहे. मात्र प्रत्यक्षात घाटांवर आवश्यक यंत्रणा कार्यान्वित नसून सीसीटीव्ही कॅमेरेही बसविण्यात आलेले नाहीत. खडकपूर्णा धरणातून पाणी सोडल्यामुळे नदीपात्रातील पाण्याखालील भागातूनच पोकलेन व जेसीबीच्या सहाय्याने मोठ्या प्रमाणात वाळू उपसा सुरू असल्याचे समोर आले आहे.

या अवैध उत्खननाचे व्हिडिओ व छायाचित्रे सोशल मीडियावर व्हायरल होत असतानाही मंठा महसूल व पोलीस प्रशासनाकडून कोणतीही ठोस कारवाई होताना दिसत नाही. तहसीलदार सुमन मोरे, मंडळ अधिकारी संजय उफाड व तलाठी विठ्ठल उफाड यांच्याकडे वारंवार तक्रारी करूनही दुर्लक्ष होत असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

याबाबत उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड, जिल्हा गौण खनिज अधिकारी तुषार निकम व अप्पर जिल्हाधिकारी मिसाळ यांनी स्वतः लक्ष घालून चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी होत आहे.

**पोकलेनवर कारवाई कधी?**

टाकळखोपा–किर्ला घाटांवर पाण्यातून थेट पोकलेनद्वारे वाळू उपसा सुरू असल्याने या यंत्रणांवर कारवाई कधी होणार, असा प्रश्न नागरिकांमधून उपस्थित होत आहे.

**जिल्हाधिकाऱ्यांचे नेमकं दुर्लक्ष?**

जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी तात्काळ स्वतंत्र पथक पाठवून प्रत्यक्ष पाहणी करावी व दोषींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी जोर धरत आहे.दरम्यान, टाकळखोपा–सासखेडा परिसर अवैध वाळू उपशाचे केंद्र बनत असून या प्रकारामुळे शासनाचा महसूल बुडण्याची शक्यता व्यक्त होत आहे. संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी नागरिकांतून होत आहे.

# शौचालयाच्या नावाने होणारा भ्रष्टाचार महिलांनी हाणून पाडला

**दैनिक युवक आधार**

**विशेष प्रतिनिधी** - बोरिवली विधानसभा क्षेत्रातील प्रभाग क्रमांक 14 मधील राजेंद्र नगर मधील शिवाजी नगर विभागाततील सार्वजनिक शौचालयात झालेल्या भ्रष्टाचारावर आज स्थानिक महिलांनी हल्ला बोल केला.शौचालयाच्या मूळ जागेवर स्थानिक भाजपा पदाधिकाऱ्यांनी अनधिकृत घरे बांधून ठेवली आहेत, व आता पालिका या बाजूच्या छोट्या शौचालयाला तोडून नवीन दोन मजली शौचालय बांधणार असल्याचा बॅनर पालिकेने लावला, त्यात हे शौचालय धोकादायक असून ते तोडणार असून याचा वापर कोणी करु नये असा उल्लेख केला आहे.स्थानिक महिला या विरोधात एकत्र आल्या व त्यांनी हा बॅनर फाडून घोषणा दिल्या की पालिका कोणाच्या फायद्यासाठी हें बांधकाम करत आहे, जर पालिकेला शौचालयाचे बांधकाम करायचे असेल तर त्यांनी शौचालयाच्या मूळ जागेवर जिथे स्थानिक भाजपा कार्यकर्त्यांनि कब्जा केला आहे त्यावर करावे,आताचे शौचालय तोडू नये, हे तोडले तर स्थानिकांचे हाल होतील, हे तोडण्यापेक्षा मूळ खऱ्या जागेवर नविन



शौचालय बांधावे, मगच हें दुरुस्त करून त्यास जोडावे. याबाबतील उपमहापौर संजय घाडी यांचे सोबत व महानगर पालिकेसोबत पत्र व्यवहार झाला असून तरी आम्हा स्थानिकांचे म्हणणे ऐकले जात नाहीय, त्यामुळे आज महिलांना आक्रमक व्हावे लागले, यामागे कोणाला तरी वाचवून कोणाचे तरी खिसे भरन्यासाठी हे होतेय असे जाणवत आहे.यावेळी विभागातील पूनम शिंदे,जया रेड्डी,निकिता सोनवणे,श्रद्धा मोरे,सुनीता सोनवणे, सुरेखा अलमवर,नंदा तलवटकर,बिस्मिल्लाह शेख,खैरुन्निसा शेख,शरीफा शेख, मालन शेख,मेघना ठक्कर,शाहीन शेख,लता कोंडेरू,जयकुमार नाडर, पटेल, रफिक शेख,नूर शेख यांच्या सह अनेक महिला व पुरुष उपस्थित होते.

# हिंदी महानाट्य "जय महाकाल" चे आयोजन मंगळवारी

**जय महाकाल या महानाट्यात, चक्रवर्ती सम्राट राजा विक्रमादित्य च्या भूमिकेत आयुष तिवारी**

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** रेशीमबाग येथील कविवर्य सुरेशभट सभागृहात, मंगळवार दिनांक 21 एप्रिल रोजी, सायंकाळी 7 वाजता. निराली एंटरटेनमेंट आणि गौरीशंकर बहुउद्देशीय शिक्षण संस्था, गुरुगोरखनाथ मंदिर संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने हिंदी भव्य महानाट्य"जय महाकाल" चे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमात ला प्रमुख उपस्थिती म्हणून सौ. कांचनताई नितीनजी गडकरी, महापौर नीताताई ठाकरे, उपमहापौर लीलाताई हत्तीबेड, अभिनेत्री प्रियंका ठाकूर आणि उत्तर




प्रदेशचे आचार्य नवीन महाराज यांची उपस्थिती राहील. याप्रसंगी विशेष उपस्थितीत आमदार मोहन मते, प्रवीण दटके, कृष्णा खोपडे, अनिल सोले, माजी आमदार सुधाकर कोहळे, माजी आमदार टेकचंद सावरकर यांची उपस्थिती राहणार आहे. महानाट्याचे लेखक व दिग्दर्शक हर्षकुमार यादव आणि नागपूरातील निर्माता दर्शननाथ शंकरराव जाधव यांचे असून हा कार्यक्रम निःशुल्क आहे. तरी हिंदी महानाट्य, जय महाकाल पहाण्यासाठी विसरु नका, कारण या महानाट्यात चक्रवर्ती सम्राट राजा विक्रमादित्य आणि राजा भर्तहरिनाथ की महागाथा दाखवणार आहे. या सर्वांनी जय महाकाल, हिंदी महानाट्याचे आयोजन केलेले आहेत. तरी सर्वांनी कार्यक्रमाचा लाभ जास्तीत जास्त मोठ्या संख्येने घ्यावा. असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

# घाटकोपर पश्चिम येथील कक्ष विधानसभा संघटक यशवंत खोपकर भारत रत्न गौरव श्री पुरस्कार -२०२६ ने सन्मानित

**दैनिक युवक आधार**

**मुंबई (शांताराम गुडेकर) :** मुंबई मराठी युवा पत्रकार संघ आणि आदर्श मुंबई फाउंडेशन तसेच ओमकार अकॅडमी ऑफ आर्ट्स,संविधान जागरण परिषद -२०२६ च्यावतीने भारत रत्न गौरव श्री पुरस्कार -२०२६ वितरण सोहळा नुकताच विक्रोळी पूर्व येथील विकास कॉलेज सभागृह, कन्नवार नगर येथे मोठया थाटामाटात संपन्न झाला. पुरस्कार सोहळ्यात घाटकोपर येथील शिवसेना ग्राहक संरक्षण कक्ष घाटकोपर पश्चिम विधानसभा संघटक,मायेची सावली एक हात कर्तव्याचा संस्थापक अध्यक्ष श्री.यशवंत विठ्ठल खोपकर यांना सामाजिक कार्य क्षेत्रातील कामगिरीसाठी " भारत रत्न गौरव श्री पुरस्कार-२०२६ मान्यवरांच्या शुभहस्ते स्वीकारला. त्यांच्या सोबत राजेंद्र पेडणेकर,प्रकाश कुष्टे हे सहकारी उपस्थित होते.

यावेळी व्यासपीठावर संजय भोईर आयोजक, शिवश्री काजी सोहेल शेख छत्रपती शिवाजी महाराज यांचे



सचिव वकील पारसनीस शिवश्री काजी हैदर यांचे तेरावे वैशज, सुभेदा महेंद्र गवई भारतीय लष्कर,सानिका मोजर अभिनेत्री, ज्योतीताई दुराफे उपाध्यक्ष महिला मोर्चा मुंबई,आदी सामाजिक क्षेत्राबरोबरच वारकरी संप्रदायातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे उत्तम व नेटनेटके आयोजन मुंबई मराठी युवा पत्रकार संघ आणि आदर्श मुंबई फाउंडेशन तसेच ओमकार अकॅडमी ऑफ आर्ट्स,संविधान जागरण परिषद यांच्यातर्फे करण्यात आले होते.

दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था यांना त्यांच्या कार्याचा गौरव म्हणून वेगवेगळे पुरस्कार देऊन सत्कार करण्यात येतो. यावर्षी ग्रामीण तसेच शहरी भागातील गरजू व्यक्ती, विद्यार्थी, रुग्णांना, दिव्यांग, जेष्ठ नागरिक यांना सातत्याने मदतीचा हात देत वैद्यकीय उपचारसाठी सहकार्य करणाऱ्या घाटकोपर येथील समाजसेवक, मुक्त पत्रकार यशवंत खोपकर याना विविध क्षेत्रातील मान्यवर यांच्या शुभ हस्ते सन्मानित करण्यात आले.सामाजिक कार्य क्षेत्रातून यशवंत खोपकर यांना " भारत रत्न गौरव श्री पुरस्कार- २०२६ देण्यात आला.गेली अनेक वर्ष यशवंत खोपकर आणि त्यांची संस्था पदाधिकारी, सदस्य, सभासद आणि हितचिंतक मुंबई सह मुंबई पूर्व -पश्चिम उपनगर, ठाणे, पालघर आणि रत्नागिरी, रायगड, सिंधुदुर्ग जिल्ह्यातील अनेक ग्रामीण भागातील गरजू रुग्णांना, दिव्यांग, विद्यार्थी, जेष्ठ नागरिक, विविध रुग्णालयात उपचार मिळवून देण्यासाठी सेवाकार्य करत आहेत.तसेच दिव्यांग रुग्णांना कृत्रिम हात पाय देऊन त्यांना स्वबळावर उभे करण्यासाठी प्रोत्साहन देत आहेत.यशवंत खोपकर आणि मायेची सावली एक हात कर्तव्याचा संस्था याना या सेवा कार्यासाठी यापूर्वीही विविध पुरस्काराने सन्मानित करण्यात आलेले आहे.त्यांच्या याच कार्याचे कौतुक म्हणून त्यांना हा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले असे आयोजकांकडून सांगण्यात आले.शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे प्रणित मायेची सावली एक हात कर्तव्याचा संस्थापक अध्यक्ष यशवंत विठ्ठल खोपकर, दौलत बेल्हेकर , वसंत घडशी, गंधाली मयेकर, निर्मला आवटे, राजेंद्र पेडणेकर, संतोष चादे, वैभव डोके, महेश कुलकर्णी, विश्वास तेली, राजेंद्र चिखलकर, संतोष होलब यांच्या सहकार्यने यशवंत खोपकर सातत्याने विविध उपक्रम राबवत असतात. त्यांना हा पुरस्कार प्राप्त झाल्याबद्दल अनेकांनी त्यांना अभिनंदनसह शुभेच्छा दिल्या आहेत.

# पवनपुत्र नगरचा वीज प्रश्न कायमचा निकाली ; महावितरणकडून नवीन रोहित्र कार्यान्वित

**दैनिक युवक आधार**

**सतीश कडू संपादक नागपूर विभाग :** प्रभाग क्रमांक 13 मधील पवनपुत्र नगर, गोधनी सिम आणि गारगोठी परिसरातील नागरिकांना गेल्या काही दिवसांपासून वारंवार खंडित होणाऱ्या वीजपुरवठ्यामुळे मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत होते. उन्हाचा तडाखा वाढत असताना 'फेज' जाण्याचे प्रमाण वाढल्याने स्थानिक रहिवाशांमध्ये नाराजी होती. ही समस्या गांभीर्याने घेत महावितरणने या भागात नवीन रोहित्र (ट्रान्सफॉर्मर) बसवून तो आज कार्यान्वित केला आहे, ज्यामुळे या भागातील विजेचा प्रश्न आता कायमचा सुटला आहे.

या परिसरात विजेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढल्याने जुन्या यंत्रणेवर अतिरिक्त ताण येत होता, परिणामी वारंवार तांत्रिक बिघाड होऊन वीजपुरवठा खंडित होत होता. या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढण्यासाठी महावितरणने नवीन रोहित्र मंजूर करून त्याचे काम युद्धपातळीवर पूर्ण केले. शनिवारी (दि. 18) हे नवीन रोहित्र प्रणालीशी जोडले गेल्याने विजेचा दाब (व्होल्टेज) स्थिर झाला असून नागरिकांना अखंडित वीज मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.



हे अवघड काम महावितरणच्या हुडकेशवर विभागाचे उपकार्यकारी अभियंता निलेश भगत यांच्या मार्गदर्शनाखाली पूर्ण करण्यात आले. सहाय्यक अभियंता भारत पाटील यांनी घटनास्थळी उपस्थित राहून कामाचे नियोजन केले. विशेषतः खरबी येथील तांत्रिक कर्मचारी रूपेश निखाडे आणि वैद्य यांनी भर उन्हात आणि तांत्रिक आव्हानांचा सामना करत हे काम यशस्वीरीत्या पूर्णत्वास नेले. या कर्मचाऱ्यांच्या तत्परतेमुळेच अतिशय कमी वेळात नवीन रोहित्र कार्यान्वित होऊ शकले.

परिसरातील विद्युत पुरवठा सुरळीत झाल्याने नागरिकांनी सुटकेचा निःश्वास टाकला आहे. प्रभाग 13 च्या नगरसेविका मनीषा यादव यांनी या कामाबद्दल समाधान व्यक्त केले आहे. त्या म्हणाल्या की, "नागरिकांची गैरसोय टाळण्यासाठी महावितरणच्या अधिकाऱ्यांनी आणि कर्मचाऱ्यांनी दाखवलेली तत्परता कौतुकास्पद आहे. या नवीन रोहित्रांमुळे उन्हाळ्याच्या दिवसांत रहिवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे." याबद्दल त्यांनी महावितरण कंपनीचे आणि संपूर्ण तांत्रिक चमूचे मनापासून आभार मानले आहेत.